कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | गुरुवार | दि. १३ ऑगस्ट २०२६ | अंक ६८ | पृष्ठे ८ | किंमत ५₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

राज्यात घरोघरी गणना अंतिम टप्प्यात

मुंबई : मतदार यादीच्या विशेष सखोल फेरतपासणी अंतर्गत घरोघरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. राज्यातील सुमारे १ कोटी ८० लाख ६० हजार म्हणजेच १८.४६ टक्के मतदारांनी अद्याप गणना प्रपत्र जमा केलेले नाही. त्यामुळे या मतदारांच्या नावांबाबत पुढील कार्यवाही होण्याची शक्यता आहे. राज्यातील ९ कोटी ७८ लाख ५४ हजार मतदारांपैकी ९९ टक्के मतदारांना गणना प्रपत्रांचे वाटप झाले असून, ७ कोटी ६० लाख ९८ हजार प्रपत्रांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे.

कार्लेखिंडीजवळ दोन वेगवेगळे अपघात

रायगड : अलिबाग-पेण मार्गावरील कार्लेखिंडीजवळ



बुधवारी सकाळी दोन वेगवेगळे अपघात झाले. या अपघातांमध्ये सुदैवाने जीवितहानी टळली. ट्रकच्या धडकेत स्कुटीवरील तरुणी तसेच रस्त्याच्या बाजूला कलंडलेल्या एसटी बसमधील प्रवासी किरकोळ जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. यातील दोन्ही अपघात काही अंतरावर घडले. मिळालेल्या माहितीनुसार, मुरूड •➤पान २ वर

गडचिरोली आश्रमशाळाप्रकरणी आदिवासी मंत्र्यांनी राजीनामा द्यावा

शिक्षणहक्कासाठी शेकाप आक्रमक

सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील यांची मागणी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

गडचिरोलीतील जपतलाई येथील निवासी आश्रमशाळेतील दुर्घटनेनंतर दुर्गम आणि आदिवासी भागातील शाळा बंद करण्याऐवजी शासनाने तेथील शैक्षणिक सुविधा सक्षम कराव्यात, अशी मागणी शेकापचे सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील यांनी केली आहे. शाळा बंद करून आदिवासी मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.



शासनाने आणि पालकमंत्र्यांनी जबाबदारीतून पळ काढणे थांबवावे. निष्काळजी अधिकाऱ्यांवर आणि जबाबदारांवर तात्काळ कठोर कारवाई करावी. शाळा बंद न करता तिथे तातडीने दर्जा सुधारून पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवा पुरवाव्यात, अशी भूमिका जयंत पाटील यांनी मांडली.

दुर्गम भागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याचे कारणपुढेकरूनशाळाबंदकरण्याचा मार्ग प्रशासनाकडून स्वीकारला जात असेल, तर त्याचा थेट परिणाम आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणार आहे. आधीच वाहतूक, पायाभूत सुविधा आणि इतर मूलभूत अडचणींचा सामना करणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा दूर गेल्यास शिक्षण सोडण्याची वेळ येऊ शकते, अशी चिंता व्यक्त होत आहे. रायगडमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वाहतूक सुविधा वाढवल्याने काही भागांत विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढल्याचे सरकारी नोंदीही दर्शवतात.

एकीकडे अधिकाऱ्यांचा हा अक्षम्य निष्काळजीपणा आणि दुसरीकडे घटनेनंतर थेट शाळाच बंद पाडण्याचा प्रशासनाचा सोयीस्कर प्रयत्न, ही चिंताजनक बाब असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. शाळा बंद करणे हा उपाय नसून, आदिवासी लेकरांचा शिक्षणाचा अधिकार हिरावून घेण्याचा प्रकार आहे. शाळा बंद पडल्यास दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी पुढे शिक्षणासाठी जायचे कुठे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. निष्काळजीपणामुळे शाळांची अवस्था खराब झाली असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी शाळाच बंद करण्याचा निर्णय घेणे योग्य नाही. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून शाळा सुरू ठेवाव्यात, दर्जा सुधारावा आणि विद्यार्थ्यांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी शेकापकडून करण्यात आली आहे.

एखादी दुर्घटना घडल्यानंतर जागे होण्याऐवजी शासनाने आधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजचेचे आहे. आदिवासी विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा हक्क आणि त्यांच्या जीवाची सुरक्षितता याबाबत कोणतीही तडजोड चालणार नाही, असे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

आदिवासी भागातील शाळांचा प्रश्न गंभीर

आदिवासी समाजाच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असेल, त्यांच्या हक्कांवर गदा येत असेल आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबतही प्रशासन उदासीन राहात असेल, तर या अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आदिवासी मंत्र्यांनी राजीनामा द्यावा. आदिवासी भागातील शाळांच्या इमारतींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होऊ नये यासाठी सर्व आदिवासी भागातील शाळांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करावे. यासाठी स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करून प्रत्येक शाळेच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करावी, तसेच धोकादायक इमारतींच्या दुरुस्ती अथवा पुनर्बांधणीबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाने केली आहे.

कर्जतच्या आश्रमशाळांची सुरक्षा ऐरणीवर



जंगलालगतच्या पाच आश्रमशाळांची तातडीने सुरक्षा तपासणीची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

गडचिरोली जिल्ह्यात आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसोबत घडलेल्या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातील जंगलालगत असलेल्या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीविताशी संबंधित कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने जागे व्हावे आणि तालुक्यातील सर्व आश्रमशाळांची तातडीने सुरक्षा तपासणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी शिवसेना ठाकरे पक्षाने केली आहे.

कर्जत तालुक्याचा मोठा भाग आदिवासीबहुल असून, आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी शासनाने विविध ठिकाणी आश्रमशाळा सुरू केल्या आहेत. तालुक्यात चाफेवाडी, पाथरज डोंगरपाडा, भक्ताचीवाडी-पिंगळस आणि भालिवडी येथे चार शासकीय आदिवासी आश्रमशाळा असून, माणगाववाडी येथे •➤पान २ वर

शिवसेना कुणाची? 'सर्वोच्च' घमासान

नवी दिल्ली : शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी २०१८ मधील पक्षघटनेचा मुद्दा मांडला. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जोयमाल्य बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. सिब्बल यांनी २०१८ मध्ये पक्षघटनेनुसार १२ उपनेते नामनिर्देशित, तर २१ उपनेत्यांची निवड झाल्याचे सांगत त्याची माहिती निवडणूक आयोगाला दिल्याचा दावा केला. संबंधित कागदपत्रांवर ४ एप्रिल २०१८ रोजीचा आयोगाचा शिक्का आणि स्वाक्षरी असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. ही कागदपत्रे नंतर तयार केल्याचा दावा आयोगाकडून करण्यात आल्याचे न्यायालयाने नमूद केले.

तिसऱ्या मुंबईविरोधात शेतकऱ्यांचा एल्गार

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

- **१५ ऑगस्टला कोकण भवनवर धडक**
- **उरण-पनवेल-पेणमधील १२४ गावांतील शेतकऱ्यांचा प्रकल्पाला विरोध**
- **२५ हजार हेक्टर जमीन बाधित होण्याचा दावा**

उरण, पनवेल आणि पेण तालुक्यांतील १२४ गावांचा समावेश असलेल्या प्रस्तावित तिसऱ्या मुंबई नवनगर प्रकल्पाविरोधात शेतकरी आक्रमक झाले आहेत. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर सुपीक शेतजमीन संपादित केली जाणार असल्याचा आरोप करत एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी समितीने आंदोलनाची हाक दिली आहे. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता कोकण भवन, नवी मुंबई येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाने ४ मार्च २०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल आणि पेण तालुक्यांतील १२४ गावांमधील सुमारे ३२३ चौ. कि.मी. क्षेत्र नवनगर म्हणून घोषित केले आहे. समितीच्या म्हणण्यानुसार, या निर्णयामुळे संबंधित गावांतील सुमारे २५ हजार हेक्टर शेतजमिनीवर संकट आले आहे.

या अधिसूचनेनंतर सरकारने प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी एमएमआरडीएची नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. मात्र, प्रकल्पासाठी निवडण्यात आलेली जमीन मोठ्या प्रमाणावर सुपीक असून, या जमिनीवर भातशेतीसह विविध पिके घेतली जातात, असा दावा समितीने केला आहे.

या भागातील ४२ गावे सिंचन योजनेखाली असून सरकारने त्यासाठी ७६७ कोटी •➤पान २ वर

> मुख्यमंत्र्यांनी परस्पर सिंगापूरच्या कंपनीसोबत करार करून सात महिन्यांत आराखडा तयार करण्याचे आदेश दिले आहेत. २०२४ मध्ये अधिसूचना काढल्यापासून आम्ही हरकती दाखल करून सातत्याने पत्रव्यवहार करत आहोत; मात्र आजपर्यंत भेटीसाठी वेळ दिलेली नाही. ज्यांच्या जमिनी घेणार, त्यांच्याशी संवाद साधण्याची गरज सरकारला वाटत नाही का? सरकारची ही हुकूमशाही आम्ही खपवून घेणार नाही. शासनाचा निषेध करण्यासाठी १५ ऑगस्टला कोकण भवनसमोर लाक्षणिक उपोषण करणार आहोत.
>
> – सुधाकर पाटील, अध्यक्ष

गोगावलेंची पुन्हा थट्टा!

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

- **गोगावलेंच्या दाव्यानंतरही अधिकृत घोषणा नाही**

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून सुरू असलेल्या राजकीय घडामोडींना पुन्हा एकदा अनपेक्षित वळण मिळाले आहे. 'मीच रायगडचा पालकमंत्री होणार' असा आत्मविश्वास व्यक्त करणारे मंत्री भरत गोगावले यांचा दावा पुन्हा एकदा हवेतच विरला आहे. काल पालकमंत्रीपदाबाबत अधिकृत निर्णय होईल, अशी चर्चा असतानाही दिवसभरात कोणतीही घोषणा न झाल्याने 'पालकमंत्री'चा फुगा फुटला आणि गोगावलेंची पुन्हा थट्टा झाली, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

विधान परिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिकेत तटकरे यांना केलेल्या मदतीच्या बदल्यात राष्ट्रवादीकडून



याच पार्श्वभूमीवर गोगावलेंच्या वक्तव्याने चर्चेला आणखी हवा मिळाली. अधिकृत आदेश निघण्यापूर्वीच 'मीच पालकमंत्री' असा दावा केल्याने •➤पान २ वर

गोगावलेंच्या हस्ते ध्वजारोहण

यंदाच्या प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण कार्यक्रमासाठी राज्य सरकारने नावांची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार, मंत्री गिरीश महाजन हे नाशिकमध्ये तर भरत गोगावले रायगडमध्ये ध्वजारोहण करणार आहेत. त्यामुळे अदिती तटकरे यांना कोकण विभागीय कार्यालयात ध्वजारोहण करावे लागणार आहे. मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार बीडमध्ये ध्वजारोहण करणार आहेत. तर, राज्यपालांकडून पुण्यात ध्वजारोहण करण्यात येईल.

दिघी बंदर विस्तारीकरणाला मच्छिमारांचा विरोध




- **१४० एमएमटीपीए क्षमतेच्या विस्तारावर संताप व्यक्त**
- **सोमवारी होणाऱ्या जनसुनावणीत मांडणार भूमिका**

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

दिघी बंदराच्या प्रस्तावित विस्तारीकरणामुळे पारंपरिक मासेमारी व्यवसायासह राजपुरी खाडी आणि सागरी परिसंस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करत मच्छिमार आक्रमक झाले आहेत. दिघी बंदराची विद्यमान माल हाताळणी क्षमता २३.६५ वरून तब्बल १४० दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष करण्याच्या प्रस्तावाला स्थानिक मच्छिमारांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. सोमवारी (दि.१७) श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले येथील अल्का क्रिकेट क्लब मैदानावर होणाऱ्या जनसुनावणीत संघटितपणे आपली भूमिका आणि आक्षेप मांडण्याची तयारी मच्छिमारांनी केली असल्याची माहिती राजपुरी मच्छिमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष विजय गिदी यांनी दिली.

मुरूड तालुक्यातील राजपुरी तसेच म्हसळा खाडी परिसरातील हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह पिढ्यान्पिढ्या मासेमारीवर अवलंबून आहे. मात्र, प्रस्तावित विस्तारामध्ये मोठ्या प्रमाणावर समुद्र व आंतर-ज्वारीय क्षेत्रात भराव, गाळ काढणे, ब्रेकवॉटर, जहाजांसाठी सुविधा आणि एसपीएम उभारण्याचे •➤पान २ वर

बांगलादेशी महिलेला 'लिव्हिंग सर्टिफिकेट' कोणी दिले?



- **कागदपत्रे देणारे कोण? मदत करणाऱ्या तरुणांचीही चौकशी होणार का?**

। रायगड/पेण । प्रतिनिधी ।

पेण शहरात एका महिलेच्या तक्रारीनंतर समोर आलेल्या कथित बांगलादेशी महिलेच्या प्रकरणाने आता अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. संबंधित महिलेला विशेष पथकाने ताब्यात घेऊन चौकशी केली असता तिचे नाव मन्नत निजाम अन्सारी असल्याचे समोर आले असून, ती बांगलादेशी नागरिक असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असताना सर्वात मोठा प्रश्न मात्र तिच्या हातात असलेल्या भारतीय शाळेच्या दाखल्यावरून निर्माण झाला आहे.

३१ जुलै रोजी निशा गोडिवले यांनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचे सांगण्यात येते. मात्र, त्यावेळी या तक्रारीची •➤पान २ वर



एकाच रस्त्याचे आठ वेळा भूमीपूजन | बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये संताप

यंदाही बाप्पाचे आगमन खड्ड्यांतूनच

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे काम करण्याचा दिखावा मागील दोन वर्षांपासून सुरु आहे. काँक्रिटीकरणासह डांबरीकरण करण्यासाठी मशिनरीदेखील आणण्यात आल्या. मात्र, नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे ठेकेदारांचा कारभार असल्याचे उघड झाले. या मार्गावरील वावे-सुडकोली रस्त्यावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उदासीनतेमुळे गणरायाचे आगमन यंदाही खड्ड्यांतून होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत.



अलिबाग-रोहा-साईपर्यंतचा ८५ किलोमीटरचा रस्ता बांधा, वापरा व हस्तांतरित करा या योजनेंतर्गत मंजूर करण्यात आला होता. पावणे दोनशे कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. गुजरातमधील एका कंपनीला या रस्त्याचा ठेका देण्यात आला. रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन आठ वेळा करण्यात आले. त्यामध्ये भाजप आणि शिंदे •➤पान २ वर

ठेकेदार मालामाल करण्याचा घाट

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे काम गुजरातमधील कंपनीला दिले आहे. त्या कंपनीला बदलून नव्याने निविदा काढून कामे केली जाणार असल्याची चर्चा आहे. आतापर्यंत दोन ठेकेदार निवडले आहेत. त्याचा नाहक त्रास प्रवाशांना होत असून, ठेकेदार मालामाल करण्याचा घाट या विभागाने सुरु केल्याची चर्चा रंगत आहे.

पान १ वरून

तिसऱ्या मुंबईविरोधात शेतकऱ्यांचा एल्गार

रुपये मंजूर केले आहेत. त्या गावांत कालव्याची कामेही सुरु झाली आहेत. त्यामुळे एकीकडे शेतीसाठी सिंचन व्यवस्था उभारायची आणि दुसरीकडे त्याच सुपीक जमिनीवर मोठा नागरी प्रकल्प उभारायचा, असा विरोधाभास निर्माण झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. १५ ऑगस्ट रोजी कोकण भवन येथे होणाऱ्या लाक्षणिक उपोषणात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष सुधाकर पाटील, कार्याध्यक्ष संतोष ठाकूर आणि सरचिटणीस रूपेश पाटील यांनी निवेदनद्वारे केले आहे.

पर्यावरणाला धोका

प्रस्तावित प्रकल्पाच्या परिसरात खारफुटी, कांदळवन आणि जैवविविधता मोठ्या प्रमाणावर असल्याचा दावा समितीने केला आहे. या परिसरात पारंपरिक पद्धतीने मासेमारी, शेती, दुग्धव्यवसाय आणि इतर व्यवसायांवर अनेक कुटुंबांची उपजीविका अवलंबून आहे. तिसऱ्या मुंबईची उभारणी झाल्यास या नैसर्गिक साधनसंपत्तीवर तसेच स्थानिकांच्या रोजगारावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. समितीने मुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्र्यांसह संबंधित प्रशासनाकडे निवेदने देऊनही अद्याप ठोस प्रतिसाद मिळालेला नसल्याचा आरोप केला आहे. प्रकल्पबाधित शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांची भूमिका जाणून घेण्याची मागणीही करण्यात आली आहे.

मंत्री महोदयांचे दुर्लक्ष

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांसोबत बैठक घेण्याची मागणी समितीने केली आहे. मात्र, महिनाभराचा कालावधी उलटूनही बैठकीसंदर्भात कोणताही ठोस प्रतिसाद मिळाला नसल्याचे समितीचे म्हणणे आहे. यापूर्वी ३ जुलै २०२६ रोजी कोकण भवन येथे आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर कोकण विभागीय आयुक्तांसोबत बैठक झाली होती. या बैठकीत मुख्यमंत्री कार्यालय आणि नगरविकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक घेण्याची विनंती करण्यात आली होती. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते. मात्र, अद्याप प्रश्न म ार्गी न लागल्याने आता पुन्हा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

दिघी बंदर विस्तारीकरणाला मच्छिमारांचा विरोध

नियोजन असल्याने मासेमारीची पारंपरिक क्षेत्रेच धोक्यात येतील, असा मच्छिमारांचा आक्षेप आहे.

प्रकल्पाच्या प्रस्तावानुसार विद्यमान सुमारे १४१ हेक्टर भराव क्षेत्र वाढवून तब्बल ४४५ हेक्टरपर्यंत नेण्याचे नियोजन आहे. म्हणजेच, सुमारे ३०४ हेक्टर अतिरिक्त आंतर-ज्वारीय व उप-ज्वारीय क्षेत्र कायमस्वरूपी भराव करून बंदरासाठी वापरण्यात येणार असल्याचा दावा मच्छिमारांनी केला आहे. या भागातील जैवविविधता, मासे, शिंपले आणि इतर सागरी जीवसृष्टीवर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय प्रकल्पासाठी सुमारे ६० दशलक्ष घनमीटर गाळ काढण्याचे, तसेच त्यानंतर दरवर्षी सुमारे १४.६ दशलक्ष घनमीटर गाळ काढण्याचे प्रस्तावित असल्याने गाळाचा परिणाम समुद्रातील पाण्याची गुणवत्ता, माशांची उपलब्धता आणि मासेमारीवर होण्याची शक्यता मच्छिमारांनी व्यक्त केली आहे.

मच्छिमारांच्या म्हणण्यानुसार, प्रकल्पाच्या पर्यावरणीय अहवालात प्रस्तावित एसपीएमचे स्थान विद्यमान मासेमारी क्षेत्राशी संबंधित असल्याचे नमूद आहे. या परिसरात जहाजांची ये-जा, नांगरणी आणि बंदराच्या अन्य सुविधा वाढल्यास पारंपरिक मासेमारी क्षेत्रावर निर्बंध येण्याची शक्यता आहे. पिढ्यान्पिढ्या ज्या समुद्रावर आमची उपजीविका चालते, त्याच समुद्रात बंदराचा विस्तार करून आमचा व्यवसाय हिरावून घेतला जाणार असेल तर तो आम्ही मान्य करणार नाही, अशी भूमिका मच्छिमारांनी घेतली आहे.

दिघी बंदराची क्षमता वाढविण्याच्या नावाखाली समुद्रात मोठ्या प्रमाणावर भराव आणि गाळ काढण्याचे काम झाल्यास नैसर्गिक पाण्याचा प्रवाह, मासळीचे अधिवास आणि खाडीची सागरी परिसंस्था बदलण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रस्तावित दिघी बंदर विस्तारीकरण प्रकल्प तात्काळ रद्द करावा, अशी प्रमुख मागणी मच्छिमार समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

दरम्यान, अध्यक्ष विजय गिदी यांनी मच्छिमारांनी मोठ्या संख्येने जनसुनावणीला उपस्थित राहून आपले हक्क आणि आक्षेप ठामपणे मांडावेत, असे आवाहन केले आहे. राजपुरी खाडी आणि पारंपरिक मासेमारी वाचविण्यासाठी मच्छिमार आता निर्णायक लढाईच्या भूमिकेत असल्याचे चित्र आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने सोमवारी दुपारी दोन वाजता होणाऱ्या जनसुनावणीत मच्छिमार तसेच स्थानिक नागरिकांचे आक्षेप ऐकून घेतले जाणार आहेत. त्यानंतर त्याचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात येईल. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. - संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड

बांगलादेशी महिलेला 'लिव्हिंग सर्टिफिकेट' कोणी दिले?

अपेक्षित गांभीर्याने दखल घेण्यात आली का, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. संबंधित महिलेने पोलिसांकडे आजमगड येथील शाळेचा दाखला सादर केला होता. या दाखल्यावर तिची जन्मतारीख ११ डिसेंबर २००४, आईचे नाव सलमा आणि वडिलांचे नाव निजाम असल्याचा उल्लेख आहे.मात्र, या कथित लिव्हिंग सर्टिफिकेटच्या स्वरूपावरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दाखल्यावर मुख्याध्यापकांची सही लाल शाईने असल्याचे, तर काही माहिती अपूर्ण असल्याचे तक्रारदारांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे हा दाखला खरा आहे का? तो कोणत्या शाळेने जारी केला? संबंधित शाळेच्या नोंदवहीत या महिलेची नोंद आहे का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जर ती बांगलादेशी नागरिक असल्याचे तपासात निष्पन्न झाले, तर तिला आजमगड येथील शाळेचा दाखला मिळालाच कसा? हे प्रश्न आता तपास यंत्रणेसमोर उभे ठाकले आहेत.

कागदपत्रांच्या मुळापर्यंत पोहोचणार का?

एखाद्या व्यक्तीच्या नागरिकत्वाचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर केवळ दाखला स्वीकारून प्रकरण थांबविण्याऐवजी त्या कागदपत्राची सत्यता तपासणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. संबंधित शाळेची प्रवेश नोंद, जन्मनोंद, पालकांची माहिती, दाखला देण्याची प्रक्रिया आणि तो दाखला नेमका कोणी मिळवून दिला, याचा तपास होणे गरजेचे आहे. हा दाखला बनावट असेल तर तो तयार करणारे कोण? खरा असेल तर त्यामागील संपूर्ण नोंद काय? आणि जर एखाद्या परदेशी नागरिकाला भारतीय कागदपत्रे मिळवून देण्यात आली असतील, तर त्यामागे स्थानिक पातळीवर कोणाचे जाळे कार्यरत आहे? या प्रश्नांची उत्तरे तपासातून समोर येणे आवश्यक आहे.

पेणमधील दोन तरुणांची भूमिकाही तपासाच्या केंद्रस्थानी?

या महिलेला पेण शहरातील दोन तरुणांनी मदत केल्याचा आरोपही पुढे येत आहे. त्यामुळे संबंधित तरुणांचा या महिलेशी नेमका संबंध काय होता, तिची ओळख त्यांना कशी झाली, तिच्या कागदपत्रांबाबत त्यांना काय माहिती होती आणि तिला वास्तव्यास अथवा इतर बाबींमध्ये त्यांनी काही मदत केली का, याची पोलिसांनी सखोल चौकशी करणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न!

३१ जुलै रोजी तक्रार दिल्यानंतर या प्रकरणाची तातडीने आणि सर्वंकष चौकशी झाली होती का? संबंधित महिलेने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी त्याचवेळी का झाली नाही? केवळ एका दाखल्याच्या आधारे तिच्या नागरिकत्वाबाबत पोलिसांनी भूमिका घेतली असेल, तर ती कार्यपद्धती कितपत योग्य होती? पेण पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केवळ संबंधित महिलेपुरता मर्यादित न ठेवता कागदपत्रे तयार करणारे, उपलब्ध करून देणारे, स्थानिक पातळीवर मदत करणारे आणि संपूर्ण प्रकरणामागील संभाव्य साखळी यांचा शोध घ्यावा, अशी मागणी होत आहे. आता या महिलेचे नागरिकत्व, तिच्या कागदपत्रांची सत्यता आणि तिला मदत करणाऱ्या व्यक्तींची भूमिका तपासातून स्पष्ट होते का, याकडे पेणकरांचे लक्ष लागले आहे.

कर्जतच्या आश्रमशाळांची सुरक्षा ऐरणीवर

विनाअनुदानित आदिवासी आश्रमशाळा आहे. या सर्व आश्रमशाळा जंगल परिसरालगत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. पावसाळ्यात आश्रमशाळांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात गवत, झाडी-झुडपे वाढली आहेत. त्यातच चाफेवाडी आणि भक्ताचीवाडी-पिंगळस येथील आश्रमशाळा नदीलगत असल्याने साप, विंचू तसेच अन्य विषारी सरपटणाऱ्या प्राण्यांचा धोका कायम आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या निवासाच्या इमारती, परिसरातील स्वच्छता, रात्रीची सुरक्षा, वीजव्यवस्था तसेच आपत्कालीन परिस्थितीत तातडीची मदत मिळण्याची व्यवस्था यांची प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करणे गरजेचे आहे. आश्रमशाळांमध्ये राहणारे विद्यार्थी हे आदिवासी आणि ग्रामीण भागातील कुटुंबांमधून आलेले आहेत. त्यांच्या सुरक्षेत कोणतीही कुचराई झाली आणि एखादी दुर्घटना घडली, तर त्याची जबाबदारी कोणाची? असा सवालही या निमित्ताने उपस्थित होत आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाने धावपळ करण्यापेक्षा ती घडूच नये यासाठी आधीपासून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यातील सर्व आश्रमशाळांचे तातडीने सुरक्षा परीक्षण करण्यात यावे. विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था, इमारतींची अवस्था, परिसरातील झाडी-झुडपे, स्वच्छता, रात्रीची सुरक्षा व्यवस्था आणि विषारी प्राण्यांपासून संरक्षणासाठी केलेल्या उपाययोजनांची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मुख्याध्यापक, अधीक्षकांच्या कामाचेही 'सुरक्षा ऑडिट' व्हावे

यापुढे केवळ कागदोपत्री पाहणी करून चालणार नाही. आश्रमशाळांमधील सुरक्षा व्यवस्थेचे प्रत्यक्ष आणि नियमित ऑडिट करावे. मुख्याध्यापक व अधीक्षक विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडतात की नाही, याचीही चौकशी करावी, अशी मागणी शिवसेना ठाकरे पक्षाचे कर्जत शहर उपप्रमुख कृष्णा जाधव यांनी केली आहे.

गडचिरोलीतील घटनेची पुनरावृत्ती कर्जत तालुक्यात होऊ नये, यासाठी शासनाने सर्व आश्रमशाळांचे सुरक्षा ऑडिट करावे. शाळांचे मुख्याध्यापक आणि अधीक्षक विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी गांभीर्याने पार पाडतात की नाही, याची तपासणी करावी. जंगल भागात असलेल्या आश्रमशाळांमध्ये कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा जीव अमूल्य आहे; त्यांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड होता कामा नये. - कृष्णा जाधव

गोगावलेंची पुन्हा थट्टा!

त्यांना नेमका कोणता हिरवा कंदील मिळाला? असा सवालही उपस्थित झाला. तटकरेंनी माघार घेतली का, महायुतीत काही राजकीय तडजोड झाली का, याबाबतही तर्कवितर्क सुरू झाले. मात्र, प्रत्यक्षात काल कोणतीही अधिकृत घोषणा झाली नाही. गोगावलेंचे नाव पालकमंत्री म्हणून जाहीर झाले नाही आणि त्याबाबत कोणताही अधिकृत आदेशही समोर आला नाही. त्यामुळे गोगावलेंच्या दाव्यावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पुन्हा धक्का?

पालकमंत्रीपदाचा अधिकृत निर्णय होण्याआधीच नाव जाहीर करण्याच्या गोगावलेंच्या आत्मविश्वासाची आता राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. एकदा नव्हे, तर पुनः पुन्हा त्यांचे दावे फोल ठरत असल्याने त्यांच्या राजकीय आत्मविश्वासावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सोशल मीडियापासून नाक्या-नाक्यांपर्यंत त्यांच्या दाव्यांची खिल्ली उडवली जात असल्याचे चित्र समोर आले आहे.

यंदाही बाप्पाचे आगमन खड्ड्यांतूनच

गटामध्ये श्रेयवादही पेटले होते. अखेर प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली. मात्र, आजही अलिबाग तालुक्यातील वावे ते सुडकोली मार्गावरील रस्ता खड्ड्यात असल्याचे चित्र आहे. फणसापूर, सुडकोली, नवघर या ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले आहेत. चिखलाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. खडतर आणि जीवघेण्या प्रवासाला सामोरे जाण्याची वेळ या मार्गावरील प्रवाशांवर आली आहे. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या प्रयत्नाने २०१८-२०१९च्या दरम्यान हा रस्ता मंजूर करण्यात आला होता. मात्र, शेतकरी कामगार पक्षाला त्याचा फायदा होईल, त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी या कामाची वर्क ऑर्डर थांबवली. त्यानंतर पावसाळ्यात पुन्हा वर्क ऑर्डर काढण्यात आली. बांधा, वापरा हस्तांतरित करा या योजनेंतर्गत होणाऱ्या कामांची देखभाल दुरुस्ती ठेकेदाराने दहा वर्षे करण्याचा नियम आहे. मात्र, ज्या कंपनीला ठेका दिला होता, त्या कंपनीचा ठेकेदार पळून गेला. त्यानंतर दुसरी एजन्सीची निवड करून काम देण्यात आले. त्या कंपनीकडूनही अद्याप कामाची कोणतीही प्रगती दिसून आली नसल्याचे उघड झाले आहे.

अलिबाग तालुक्यातील वावेपासून सुडकोलीपर्यंतच्या रस्त्याला भगदाड पडले आहे. काही ठिकाणी लहान-मोठे खड्डे पडले आहे. तळ्याचे स्वरूप आले आहे. त्यामुळे जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. बाप्पाचे आगमन आता काही दिवसांत घरोघरी होणार आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उदासीनतेमुळे यंदाही बाप्पाचे आगमन खड्ड्यांतूनच होणार आहे. नियम धाब्यावर बसवून करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे वास्तव समोर आले आहे. या रस्त्याच्या कामाची निविदा पुन्हा काढली जाणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारामुळे या मार्गावरील प्रवाशांना खड्डेमुक्त रस्त्याची प्रतीक्षा करावी लागणार असल्याची चर्चा सुरु आहे.

कार्यकारी अभियंत्यांना गांभीर्य नाही!

अलिबाग-रोहा रस्त्याच्या कामाबाबत बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका खाडे यांना संपर्क साधला असता, त्यांनी फोन उचलण्याची तसदी घेतली नाही. जनतेच्या प्रश्नाला उत्तर देण्यास बांधील असताना, फोन न उचलल्याने त्यांना या रस्त्याबाबत काहीच गांभीर्य नाही, अशी संतप्त भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

कार्लेखिंडीजवळ दोन वेगवेगळे अपघात

आगारातील एसटी बस अलिबाग स्थानकातून बुधवारी (दि.१२) रात्री दीड वाजण्याच्या सुमारास मुंबईकडे निघाली. अलिबाग-पेण मार्गावरून ही बस जात होती. दरम्यान, सागावजवळ आल्यावर चालकाचा बसवरील ताबा सुटला. त्यामुळे एसटी बस रस्त्याच्या बाजूला कलंडली. सुदैवाने बाजूला असलेल्या झाडाला अडकल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, एसटीतील काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाल्याची माहिती समोर येत आहे. तसेच काही तासांनंतर कार्लेखिंड येथून उसरकडे जाणाऱ्या मालवाहू ट्रकची पुढे स्कूटीला मागून धडक लागली. त्यामध्ये स्कूटीवरील तरुणी जखमी झाली. सुदैवाने जीवितहानी टळली. दरम्यान, ट्रक चालकाचा ताबा सुटल्याने ट्रकही रस्त्याच्या बाजूला पलटी झाला. या दोन वेगवेगळ्या अपघातांमुळे रस्ता सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. ट्रकच्या धडकेने जखमी झालेल्या तरुणीला कार्लेखिंड येथील खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या दोन वेगवेगळ्या घटना घडल्या. मात्र, मोठा अनर्थ टळला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

जावक क्र :- ९२२ दिनांक :- १२/८/२६

मुरुड जंजिरा नगरपरिषद पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक २०२६

जाहीर सूचना

पथविक्रेता (उपजिवीका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिवीका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत आठ (८) पथवक्रेता यांचे सदस्यांच्या निवडणूक सन २०२४ कार्यक्रमाबाबत.

ज्याअर्थी, पथविक्रेता (उपजिवीका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिवीका संरक्षण व पथविक्री विनिमयन) (महाराष्ट्र) नियम २०१६ मधील नियम १४(२) अंतर्गत मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीतील नोंदणीकृत पथ विक्रेत्यांमधून ८ जणांची नगर पथविक्रेता समिती स्थापन करण्यात आलेली असून त्यामधून १/३ महिला आरक्षण निश्चित करण्यासाठी मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र. काआ-९/औसं/प.वि./जिल्हाधिकारी रायगड/रायगड/आदेश/२०२६/कार्या-९/७४०२, दि.१७/०७/२०२६चे आदेशान्वये माझी मुरूड जंजिरा नगरपरिषद पथविक्रेता समितीची निवडणूक प्रक्रीया पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याअर्थी, मी, श्रीमती राखी गावडे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मुरूड तथा निवडणूक निर्णय अधिकारी उपरोक्त पथविक्रेत्यांना कळिवत आहे की, मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीतील नोंदणीकृत पथ विक्रेत्यांमधून ८ जणांची नगर पथविक्रेता समिती स्थापन करण्यात आलेली असून त्यामधून सोडतीव्दारे १/३ महिला आरक्षण निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम प्रसिद्ध करीत आहे.

अ.क्र.	नगरपालिकेचे नाव	सोडत ठिकाण	सोडत कार्यवाहीची तारीख व वेळ
१	मुरुड जंजिरा नगरपरिषद	मुरुड जंजिरा नगरपरिषद सभागृह	१७/०८/२०२६ दुपारी ३.०० वाजता

सही/-
(राखी गावडे)
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मुरूड तथा
निवडणूक निर्णय अधिकारी
मुरुड जंजिरा नगरपरिषद पथ विक्रेता निवडणूक

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड क्र. १ मु. अलिबाग यांचे कार्यालय
मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात, अलिबाग - ४०२२०१
दुरध्वनी क्र. ०२१४१२२२४२८. Email : dslrraigad@gmail.com
क्र. अपिल/एस.आर. ७९/२०२६/ता. अलिबाग/जि.रायगड/२०२६/८१२ अलिबाग दि. ११/०८/२०२६

जाहिर नोटीस

प्रति,
१. सौ. विजेता विजय पाटील
रा. मु. वैजाळी, पो. हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड — अपीलदार
तर्फे अखत्यारी
२. सौ. विशाला विक्रांत पाटील
रा. मु. वैजाळी, पो. हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड
विरूद्ध
१. उप अधीक्षक भूमि अभिलेख, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
२. तहसिलदार अलिबाग महसूल सहाय्यक — जाबदार
ता. अलिबाग, जि. रायगड
३. श्री. शांताराम गणपत म्हात्रे
रा. मु. वैजाळी, पो. हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड

विषय:- मौजे वैजाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील न. भू.क्र. ४९९ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.

संदर्भ :- १. अर्जदार श्रीम. विजेता विजय पाटील यांचा दि. १८/०३/२०२६ रोजीचा अपील अर्ज.
२. इकडील नोटीस क्र. अपील क्र. ७९/२०२६/जा.क्र. ७८९ दि. २८/०७/२०२६

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपीलाच्या विलंब माफी अर्जावरील सुनावणीची तारीख १४.०७.२०२६, २१.०७.२०२६, २८.०७.२०२६ ११.०८.२०२६ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार हे सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार क्र.३ यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून पुढील सुनावणी दिनांक २५/०८/२०२६ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी दुपारी १२.३० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड क्र.१ मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ११/०८/२०२६

सही/-
(सुनिल इंदलकर)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख
रायगड, क्र.१ अलिबाग.

पनवेल महानगरपालिका
दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
''जाहीर आवाहन''

पनवेल महानगरपालिकेची तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणेकरीता सदस्य इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत

पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क्र. ३, ४ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेमध्ये ''तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती'' स्थापन करण्याबाबत नमूद केले आहे.

त्यानुसार सदर समितीत एक अध्यक्ष आणि इतर दोन व्यावसायिक अनुभवी सदस्य यांची समिती बनलेली असेल अशी तरतूद आहे. ''तक्रार निवारण व विवाद निर्णय'' समितीच्या अध्यक्ष व सदस्यांचा कालावधी पाच वर्ष इतका असेल. सदर तक्रार निवारण व विवाद निर्णय'' समितीमध्ये खालील अर्हता व अनुभव असलेल्या व्यक्तींकडून सदस्य या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदाचे नाव	पद संख्या	अ. क्र	अर्हता व अनुभव
तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती सदस्य	२	१	सदर व्यक्ती पस्तीस वर्षांहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षापेक्षा अधिक वयाची नसेल.
		२	सदर व्यक्ती मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी धारण करीत असेल.
		३	सदर व्यक्तीला स्थानिक प्राधिकरणांमधील कामाचा अनुभव असेल व शासनाचा अवर सचिव किंवा तत्सम दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल.
		४	सदर व्यक्ती कार्यकुशल, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किंवा सार्वजनिक कामाशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल.

तरी, पात्र इच्छुक व्यक्तींनी आपले अर्ज दिनांक २०/०८/२०२६ पर्यत आवश्यक त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिका आवक-जावक विभागात सादर करावेत. याविषयी अधिक माहितीसाठी पनवेल महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या शेजारी शॉपिंग कॉम्प्लेक्स दत्त झेरॉक्स च्या वर दुसरा मजला येथे संपर्क साधावा.

सही/-
(अभिषेक पराडकर)
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका
जा.क्र/पमपा/DAY-NULM/SUSV/२४२६/प्र.क्र.२२/१३६१/२०२६
दिनांक १२/८/२०२६

प्रो.जमा रू.५०/- अर्जदारतर्फे ॲड. शिल्पा अर्जुन पाटील

जाहिर नोटीस

नि. ८/ड

अलिबाग येथील मे. जिल्हा न्यायाधिश सो.
रायगड यांचे न्यायालयात
सि.चौ.अर्ज नं. ७१/२०२६
पुढील तारीख २/९/२०२६

वनिता काशिनाथ पाटील — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहिर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार वनिता काशिनाथ पाटील यांचा मुलगा कै. निलेश काशिनाथ पाटील यांचे निधन दि.०३/११/२०१६ रोजी राहत्या घरी नैसर्गिकरित्या झालेले आहे. कै. निलेश काशिनाथ पाटील यांना एक अपत्य असुन तिचे नाव कु.निशिधा निलेश पाटील असे आहे. अर्जदार या कु. निशिधा निलेश पाटील हिच्या आजी आहेत. सध्या ती अज्ञान असून अर्जदार हे कु. निशिधा निलेश पाटील हिचे नैसर्गिक पालक आहेत. हे घोषित करून मिळण्याकरीता Gaurdians And Wards Act १८९० चे कलम ७ व २९ नुसार गार्डियन दाखला मिळण्याकरीता अलिबाग येथील मा. प्रमुख जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांच्या व्यतिरीक्त कु. निशिधा निलेश पाटील यांच्या पालकत्वाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत हजर राहून लेखी हरकत नोंदवावी.

वर नमूद कालावधी योग्य ती हरकत न आल्यास अर्जदाराच्या या अर्जास कोणाचाही कसलीही हरकत नाही असे समजून मे.न्यायालय योग्य त्या पुराव्याअंती अर्जदाराचा अर्ज मंजूर करेल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ६/८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
(कनिष्ठ लिपीक)
म. जिल्हा न्यायालय
अलिबाग- रायगड

कोर्टाचा शिक्का

सही/-
(सहाय्यक अधिक्षक)
म. जिल्हा न्यायालय
अलिबाग- रायगड

पनवेल महानगरपालिका, पनवेल
जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०८/२९२/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १२/०८/२०२६

पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना

प्रति,
श्री./श्रीमती.
मा.सदस्य/ सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/ महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र.८, गुरुवार दिनांक २०/०८/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या ''आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल'' येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

सर्वसाधारण सभा क्रमांक ०८, दिनांक २०/०८/२०२६ ची विषयपत्रिका

१. मागील सर्वसधारण सभा क्र.६ दिनांक २२/०७/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.
२. शासकीय पत्रव्यवहार
३. प्रश्नोत्तरे
४. मा.आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :
१. दिनांक २२/०७/२०२६ रोजीचा स्थगित विषय -पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील अं.भु.क्र.१८४/१ ए पार्ट बहुमजली यांत्रिकी वाहनतळ उभारणे प्रस्तावास व खर्चास मान्यता मिळणेबाबत.
२. दिनांक २२/०७/२०२६ रोजीचा स्थगित विषय-पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमी (अ.भू.क्र.१०६) येथील नादुरुस्त गॅस दाहिनी बदलून नवीन गॅस दाहिनी बसवणे. (दोन युनिट) या कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.
३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, खारघर (प्रभाग क्र. १ ते ६) मधील रस्ते दुरुस्ती करिता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६-२७ व २०२७-२८ करीता)
४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब, कळंबोली (प्रभाग क्र. ७,८,९,१०,१५ व १६) मधील रस्ते दुरुस्ती करिता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६-२७ व २०२७-२८ करीता)
५. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क, कामोठे (प्रभाग क्र. ११,१२,१३ व १४) मधील रस्ते दुरुस्ती करिता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६-२७ व २०२७-२८ करीता)
६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड, पनवेल (प्रभाग क्र. १७,१८,१९ व २०) मधील रस्ते दुरुस्ती करिता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६-२७ व २०२७-२८ करीता)
७. पनवेल महानगरपालिका मालकीचे करंजाडे येथील सर्व्हे नं. ११०/ ब या जागेवर मच्छी मार्केट उभारणे.
८. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती -अ, खारघर सेक्टर १३, भुखंड क्र.१३७ येथे सामाजिक सभागृह बांधणे, प्रकल्प राबविणे व संकल्प चित्रास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
९. पनवेल महानगरपालिका हद्दीत

माथेरान नगरपरिषदेची मेहनत वाया | **आता पाण्याचे नियोजन कसे?**

पाणी सोडले, गाळ मात्र तसाच



| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान शहरात असलेल्या शार्लोट लेक तलावाचे संवर्धन करण्याचे काम केंद्र सरकारच्या अमृत-२ मधून सुरु आहे. या तलावातील २६०० ब्रास माती काढून शहरातील रस्त्यांसाठी वापरली जाणार होती; मात्र, ठेकेदाराची मर्जी राखण्यासाठी तलावातील गाळ पावसाळ्यातील पाण्याबरोबर वाहून जाईल या हेतूने तलावातील पाणी सोडून देण्यात आले. शार्लोट लेक हे माथेरान नगरपरिषदेच्या मालकिचे असून, धरणातील पाण्याची मालकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आहे. असे असतानाही नगरपरिषदेने पाणी सोडलेच कसे? आणि पाणी सोडण्यासाठी प्राधिकरणाने चावी दिलीच कशी, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. दरम्यान, एवढे करूनही शार्लोट लेक मधील गाळ आहे तसाच आहे. तसेच, पाणी सोडल्यामुळे पिण्याचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे.

माथेरान नगरपरिषदेच्या मालकीचा शार्लोट लेक तलावातील गाळ २०१३ मध्ये काढण्यात आला होता. त्यापूर्वी रोजंदारीवर मजूर घेऊन गाळ काढला जात होता. परंतु, मागील १२ पेक्षा अधिक वर्षे साठून राहिलेला गाळ काढण्यासाठी केंद्र सरकारच्या अमृत-२ मधून ५ कोटींचा निधी माथेरान नगरपरिषदेला मिळाला आहे. या निधीतून धरणातील २६०० ब्रास माती काढणे तसेच तलावाच्या आजूबाजूला भविष्यात माती वाहून येऊ नये यासाठी गॅबियन वॉल बांधण्याचे नियोजन होते. तसेच, तलावातील २६०० ब्रास मातीमिश्रित गाळ शहरातील रस्त्यासाठी वापरण्याचे निर्देश निविदेत आहेत. शार्लोट लेक हे माथेरान नगरपरिषदेच्या मालकिचे असले तरी त्यातील पाण्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मालकी आहे. मात्र, असे असतानाही ठेकेदाराला खुश करण्यासाठी माथेरान नगरपरिषदेने शार्लोट लेक मधील पाणी सोडून देण्याचा निर्णय घेतला. त्या निर्णयाला पालिकेतील स्वीकृत सदस्य माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी विरोध केला. तत्पूर्वी नवी मुंबई महापालिकेचा पाणीपुरवठा विभाग आणि जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडून धरणातील पाणी सोडण्यात येऊ नये असे आदेश देण्यात आले होते. परंतु, तरीदेखील माथेरान नगरपरिषदेने १० ऑगस्ट रोजी शार्लोट लेक मधील पाणी सोडून दिले. या लेकचे पाणी सोडण्याचा मार्ग असलेल्या विहिरींची चावी हि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे आहे. असे असतानाही जीवन प्राधिकरणाकडील चावी माथेरान नगरपरिषदेला कोणी दिली, असा प्रश्न निर्मण झाला आहे.

दरम्यान, धरणातील पाणी हे शार्लोट लेक मधील गाळासोबत वाहून जावे, यासाठी पाणी सोडण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, तरीदेखील शार्लोट लेक मधील गाळ आहे तसाच असल्याने नगरपरिषदेचा पाणी सोडण्याचा डाव त्यांच्यावर पालटला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आता हा गाळ बाहेर काढण्यासाठी ठेकेदार काय करणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दुसरी बाब म्हणजे माथेरानमध्ये इंधनवर चालणाऱ्या कुठल्याही वाहनांना परवानगी नसल्याने मनुष्यबळ वापरून गाळ काढावे लागणार आहे. हि बाब लक्षात घेऊन शासनाने आता शार्लोट लेक गाळमुक्त करण्याची मोहीम यशस्वी करण्यसाठी पुढाकार घेण्याची मागणी माथेरानकरांकडून करण्यात येत आहे.

मात्र, आता त्याहून बिकट परिस्थिती माथेरानमध्ये निर्माण झाली आहे. शार्लोट लेक मधील पाणी सोडल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्भवला आहे. पावसाळ्यात नेरळ येथील उल्हास नदीवरून उचलले जाणारे पाणी बंद असते. त्यामुळे पावसाळ्यात माथेरानमधील नळाला शार्लोट लेक मधून पाणी दिले जाते. मात्र, शार्लोट लेकमध्ये पाणीच राहिले नसल्याने नळाला पाणी सोडणार कुठून, असा प्रश्न निर्माण झाला आहे. एकतर नेरळ येथून पाण्याचा उपसा करून माथेरानकरांना पाणी वितरित करावे लागणार आहे. किंवा उल्हास नदीचे गढूळ पाणी प्यावे लागणार आहे. त्यामुळे त्यामुळे सध्यातरी माथेरानकरांना पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागणार आहे.

लेक कधी भरणार?

शार्लोट लेक पूर्ण भरण्यासाठी किमान महिनाभर पावसाची गरज असते. त्यात आता ऑगस्ट महिना सुरु आहे. तलावातील गाळ काढण्यासाठी किमान महिना लागण्याची शक्यता आहे. हि बाब लक्षात घेता माथेरान नगरपरिषद् आपले धरण पाण्याने भरावे यासाठी काय करणार? तसेच, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाण्याचा साठा शार्लोट लेक मध्ये व्हावा यासाठी कोणती भूमिका घेणार? याकडे माथेरानकरांचे लक्ष लागून राहिले आहे.

कारवाई कोणावर?

माथेरान परिषदेच्या मालकीच्या शार्लोट लेकमधील पाण्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा हक्क आहे. त्यामुळे पाणी सोडण्यासाठी धरणाच्या विहिरींची चावी माथेरान नगरपरिषदेला कोणी दिली? त्याचवेळी वरिष्ठ म्हणत असताना प्राधिकरणाच्या कोणत्या अधिकाऱ्याने ती चावी दिली आणि पाणी सोडले याचा शोध शासन घेणार का? नवी मुंबई महापालिका मोरबे धरणाच्या परिसरात पाणी सोडणाऱ्या माथेरान नगरपरिषदेवर कारवाई करणार का? असे अनेक प्रश्न शार्लोट लेक मधील पाणी सोडल्याने पुढे आले आहेत.



● (छायाचित्र: सुधीर नाझरे)

मुरूडमधील बळीराजा सुखावला

| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |

मुरुड परिसरात गेली ४ दिवस सतत मुसळधार पाऊस पडत असून, सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. बुधवारी (दि.१२) सकाळी मुरुड तहसील कार्यालयाकडून पावसाची नोंद तपासण्यात आली तेव्हा १०० मिलीमीटर विक्रमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे फक्त एका दिवसात पडलेल्या विक्रमी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. मात्र, या पावसामुळे शेतकरी सुखावला असून, लावणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत.

मुरूड मध्ये गेले काही दिवस सोसाट्याचा वारा व पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे येथील रस्त्यांवर पाणी साचले होते. तालुक्यात आतापर्यंत एकूण १३३४ मिलीमीटर पाऊस पडला असून, सर्वात जास्त पावसाची नोंद बुधवारी (१०० मि.मी.) करण्यात आली आहे. यावेळी विविध ठिकाणची वाहतूक विस्कळीत झाली होती. सतत पाऊस असल्यामुळे बाजरपेठा ओस पडल्या होत्या. तसेच, येथील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे एसटी वाहतुकीला सुद्धा मोठा अडसर निर्माण होत आहे. तसेच, मुरुड अलीभाग रस्त्याचे काम सुरु असल्याने प्रवास त्रासदायक होत आहे. यादरम्यान शेतीमध्ये देखील पाणी साचले आहे. त्यामुळे या पावसामुळे शेतकरी आनंदून गेला आहे. मुरुडमधील खारआंबोळी, शीघ्रे, आगरदांडा, गारंबी परिसरातील भात शेतीच्या लावण्या अंतिम टप्प्यात आल्या आहेत.

- **तालुक्यात एका दिवसात विक्रमी पावसाची नोंद**
- **शेतीची कामे अंतिम टप्प्यात**

> यावर्षी पाऊस उशिरा झाल्याने सुरूवातीला शेतकऱ्यांचे सर्व अंदाज चुकले, सुरवातीचे राब देखील फुकट गेले. त्यानंतर पाऊस गायब झाल्याने राब लावणे जमले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना यंदा इतरांकडून राब उसने घेऊन लावणी करावी लागत आहे. यापुढे हवामान चांगले राहिले तर भात शेती चांगली होईल.
> -मनोज कामाने, शेतकरी

माणगावात भव्य तिरंगा रॅली

| माणगाव | प्रतिनिधी |

देशासाठी बलिदान देणाऱ्या वीर जवानांना अभिवादन करण्यासाठी आणि नव्या पिढीच्या मनात राष्ट्रप्रेमाची ज्योत अधिक प्रखर करण्यासाठी माणगाव शहरात दि.१४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ''तिरंगा हातात, देशप्रेम मनात'' हा संदेश घेऊन निघणाऱ्या या रॅलीत माणगावकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक समस्त माणगावकरांच्यावतीने करण्यात आले आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेली ही रॅली माणगाव शहरातील देशभक्तीचा जागर ठरणार आहे. बालाजी कॉम्प्लेक्स येथून सकाळी ९.०० वाजता रॅलीला सुरुवात होऊन कचेरी रोडमार्गे शहीद वीर यशवंतराव घाडगे स्मारकापर्यंत रॅली काढण्यात येणार आहे.

निवडक

तब्बल १.६४ कोटींचा ऐवज लंपास

पनवेल : खारघर सेक्टर-१२ येथील एका ज्वेलर्स दुकानात मध्यरात्री शटर उचकटून चोरट्यांनी तब्बल १ कोटी ६४ लाख ३४ हजार ९७६ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या चोरीमध्ये हिरे, सोन्याचे आणि प्लॅटिनमचे दागिने तसेच रोख रक्कम चोरीला गेल्याने व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खारघर सेक्टर-१२ मधील सीआयएसएफ रोडवरील उत्सव चौक परिसरातील साई कृपा प्रिमायसेस इमारतीत कॅन्डीअर लाईफस्टाईल ज्वेलर्स हे दुकान आहे. १० ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास दुकान बंद करण्यात आले होते. मंगळवारी (दि.११) सकाळी साडेदहाच्या सुमारास दुकान उघडण्यासाठी आल्यानंतर चोरी झाल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी दुकानाचे शटर हत्याराच्या साहाय्याने उचकटून आत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी दुकानातील ६८ लाख ९१ हजार ७७९ रुपये किमतीचे हिऱ्यांचे १३९ दागिने, १५ लाख ५७ हजार ३७९ रुपये किमतीचे सोन्याचे २७ दागिने, ७९ लाख ५५ हजार ८१७ रुपये किमतीचे प्लॅटिनमचे ४८ दागिने तसेच कॅश काउंटरमधील ३० हजार रुपयांची रोकड असा एकूण १ कोटी ६४ लाख ३४ हजार ९७६ रुपयांचा ऐवज लंपास केला. घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. श्वानपथक आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञांच्या मदतीने घटनास्थळाची पाहणी करण्यात आली असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे.

उलवेमध्ये अवैध दारुधंद्यावर छापा

पनवेल : उलवे परिसरातील बामणडोंगरी रेल्वे स्थानकाजवळील झोपडीमध्ये छुप्या पद्धतीने चालणाऱ्या अवैध दारुविक्रीच्या अनुधावर गुन्हे शाखेने धडक कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी मद्याचा मोठा साठा जप्त केला असून, बेकायदेशीररित्या दारुची विक्री करणाऱ्याला ताब्यात घेतले आहे. बामणडोंगरी रेल्वे स्थानकाच्या समोरील सार्वजनिक रस्त्याच्या बाजुला असलेल्या झोपडीत अवैध मद्यविक्री सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाने या ठिकाणी छापा टाकला. यावेळी या झोपडीमध्ये विविध कंपन्यांच्या दारुच्या बाटल्यांचा मोठा साठा आढळून आला. या सर्व मालाची एकूण किंमत सुमारे ७४ हजार ८८० रुपये इतकी आहे. पोलिसांनी या दारुच्या साठ्यासोबतच रोख रक्कमही जप्त केली आहे. तसेच, दारु विक्रेता लवकुश शिवभोला चौधरी (२३) या व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

अलिबागच्या मातीत रंगली देशभक्ती

'हर घर तिरंगा' अंतर्गत खुली रांगोळी स्पर्धा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर अलिबाग नगरपरिषदेतर्फे ''हर घर तिरंगा'' अभियानांतर्गत खुली रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा उर्दू शाळेतील सभागृहात बुधवारी (दि.१२) घेण्यात आली. यावेळी रांगोळीतून तिरंगा उमटविण्यामध्ये स्पर्धक रमले हाते. त्यामुळे अलिबागच्या मातीमध्ये देशभक्ती रंगल्याचे दिसून आले. तसेच, तिरंग्याच्या रंगछटांसह देशभक्तीपर संदेश आणि आकर्षक कलाकृतींच्या माध्यमातून स्पर्धकांनी राष्ट्रप्रेमाची भावना व्यक्त केली.



या स्पर्धेला अलिबाग नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी भेट देऊन स्पर्धकांच्या कलाकृतींची पाहणी केली. यावेळी नगरसेवक अश्विनी ठोसर, जमाल सय्यद आणि निवेदिता वाघमारे यांची उपस्थिती होती. यावेळी नगराध्यक्षा नाईक यांनी स्पर्धकांशी संवाद साधत त्यांच्या कलाकृतींचे कौतुक केले आणि ''हर घर तिरंगा'' अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ होत असल्याचे सांगितले.

दरम्यान, तिरंग्याचे रंग, अशोकचक्र, देशभक्तीपर प्रतिके आणि विविध संदेशांनी सभागृहातील वातावरण रंगून गेले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना १५ ऑगस्ट रोजी बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहेत. अलिबाग नगरपरिषदेच्या या उपक्रमामुळे स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवाला कलात्मक आणि देशभक्तीपूर्ण स्वरूप प्राप्त झाले होते. या स्पर्धेला प्रियंका वाघ यांचे सहकार्य लाभले.

छुप्या पद्धतीने गुटखा विक्री

चिरनेर : प्रतिबंधित असलेल्या तंबाखूजन्य गुटखा व पान मसाल्याच्या तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही उरण पूर्व विभागासह परिसरात छुप्या पद्धतीने गुटख्याची विक्री होत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी गावागावातील पान टपऱ्या व गुटख्याची विक्री होत असलेल्या ठिकाणांवर लक्ष ठेवून, या विरोधात कारवाई करणे गरजेचे आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे विराजमान झाल्यापासून अनेक ठिकाणी सहजपणे उपलब्ध होत असलेला गुटखा काही ठिकाणी बंद झाला होता. मात्र, अजूनही काही ठिकाणी गुटखा विक्री थांबत नसल्याने प्रशासनाच्या कारवाईच्या परिणामकतेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. अल्पवयीन मुलांमध्ये गुटखा सेवनाचे प्रमाण अधिक वाढले असून, पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या व्यवसाया मागील सूत्रधार कोण, असाही प्रश्न नागरिकांमधून विचारला जात आहे.

डेब्रिज टाकणारा डम्पर पकडला

| पनवेल | प्रतिनिधी |

मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असलेले डेब्रिज, माती, कचरा, रॅबीट अनधिकृतपणे नवी मुंबईत टाकणाऱ्यांविरोधात सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोच्या दक्षता पथकांनी धडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. मात्र सिडको दक्षता पथकांच्या या कारवाईनंतरही नवी मुंबईत डेब्रीज टाकण्याचे प्रकार सुरुच असल्याचे दिसून येत असून, खारघर से २२ सेंट्रल पार्क जवळ गोल्फ कोर्ससमोर सिडकोच्या मोकळ्या जागेत डेब्रीज टाकत असलेला एक डम्पर सिडकोच्या पथकांनी नुकताच पकडला. याप्रकरणी डेबीज टाकतांना मिळून आलेल्या डंपरचालकाविरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवी मुंबईत विविध ठिकाणच्या परिसरात मोकळ्या जागेमध्ये डेब्रीज माफियांकडून मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानिकारक असलेले डेब्रिज अनधिकृतपणे टाकण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यानुसार दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, आभियांत्रिकी विभाग व पोलिस विभाग यांच्यासह दि.८ ऑगस्ट रोजी सिडको कार्यक्षेत्रात मोहिम राबवत असतांना सकाळी अकराच्या सुमारास एमएच-४३-वाय-७८६७ या डंपरवरील चालक विलास गंगाधर रणशुर (४१) रा. उलवे से-२३ हा त्याच्या ताब्यातील डंपर मधून मानवी जिवितास व लोकांच्या आरोग्यास धोकादायक असलेले डेब्रीज हे अनधिकृतपणे आणून खारघर से-२२ येथील गोल्फ कोर्ससमोर सेंट्रल पार्कजवळ सिडको कार्यक्षेत्रात डेब्रीजचा डंपर खाली करत असतांना पथकाच्या हाती लागला. यावेळी भरारी पथकाने सदरचा डंपर जप्त केला असून याबाबत चालक विलास रणशुर याच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात बीएनएस २०२३ चे कलम २७१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बिल अपडेटच्या बहाण्याने गंडा

| पनवेल | प्रतिनिधी |

गॅस बिल अपडेट करण्याच्या बहाण्याने सायबर भामट्यांनी खारघरमधील ५९ वर्षीय व्यक्तीला गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. भामट्यांनी व्हॉट्सअॅपद्वारे संशयास्पद एपिके फाईल पाठवून फसवणूक झालेल्या व्यक्तीच्या मोबाईलचा ताबा मिळवून त्यांच्या बँक खात्यातून तब्बल ८ लाख ३९ हजार ७५५ रुपये लंपास केले आहेत.

खारघर येथील सतीश पिल्लाई हे गेल्या आठवड्यात आपल्या घरी असताना, त्यांना सायबर भामट्यांनी महानगर गॅस कंपनीचा कर्मचारी असल्याचे भासवले. तसेच, त्यांच्या गॅसचे बिल अपडेट करणे बाकी असल्याचे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर भामट्यांनी पिल्लाई यांच्या व्हॉट्सअॅपवर एपिके फाईल पाठवून ती डाऊनलोड करण्यास सांगितले. पिल्लाई यांनी ती फाईल डाऊनलोड केल्यानंतर भामट्यांनी त्यांचा मोबाईल हॅक करून त्यांच्या बँक खात्यातून काही वेळातच ८ लाख ३९ हजार ७५५ रुपये ऑनलाईन पद्धतीने काढून घेतले. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे पिल्लाई यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

पनवेलच्या रस्त्यांची चंद्रावर मात!

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

चंद्राच्या पृष्ठभागावर एवढे खड्डे नसतील, तेवढे खड्डे सध्या पनवेलमधील रस्त्यांवर पडल्याचे चित्र आहे. मुसळधार पावसामुळे येथील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून, या रस्त्यावरील खड्डे अनेक वेळा भरण्यात आले आहेत. परंतु, पावसाच्या एका सरीने या कामाचा दर्जा पुन्हा उघडकीस आणला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

या खड्डेमय रस्त्यावरच महापालिकेचे आरोग्य केंद्र आहे. येथे प्रसूती झाल्यानंतर नवजात बाळांना घेऊन माता आणि कुटुंबीयांना याच रस्त्यावरून घरी परतावे लागते. तसेच, परिसरात खासगी रुग्णालये असून, गर्भवती महिला तपासणीसाठी रिक्षा, चारचाकी किंवा अन्य वाहनातून याच मार्गावरून ये-जा करतात. या खड्ड्यांमुळे वाहनांना होणारे हादरे गर्भवती महिला, रुग्ण आणि नवजात बाळांसाठी त्रासदायक ठरत आहेत. तसेच, रस्त्यांवरील मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचल्याने त्यांची खोली लक्षात येत नाही. त्यामुळे दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. रिक्षा आणि चारचाकी वाहनांनाही खड्डे चुकवताना कसरत करावी लागत आहे.



पनवेल शहरातून सायकल चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरातील एका गृहनिर्माण सोसायटीच्या पार्किंगमधून सायकल चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पनवेल येथील सुशील जानकी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, येथील पार्किंगमध्ये उभी असलेली निळ्या व नारिंगी रंगाची सायकल चोरट्याने चोरून नेली. चोरीस गेलेल्या सायकलीची किंमत सुमारे ७ हजार १०० रुपये इतकी आहे.

हॉटेल टाइम्स बारवर छापा

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुका पोलिसांनी कोनगाव येथील हॉटेल टाइम्स बार अँड रेस्टॉरंट येथे छापा टाकून ९ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोनगाव येथील हॉटेल टाइम्स बार अँड रेस्टॉरंटमध्ये ६ महिला अंगात तोकडे कपडे घालून अश्लील हावभाव करताना दिसून आल्या. तसेच, येथील मॅनेजर सचिन एस कोटियन (गोकुळ सोसायटी डेरवली) आणि दोन पुरुष वेटर हे त्यांना उत्तेजन आणि प्रोत्साहन देत होते. पोलिसांनी छापा टाकल्यानंतर या नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

बोरगावातील जि.प.ची उपक्रमशील शाळा | **उपक्रमांतर्गत शाळेच्या नाविन्यपूर्ण प्रयत्नांची साक्ष**

बोलकी शाळा जिल्ह्यात सरस

| खरोशी | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील बोरगाव येथील रायगड जिल्हा परिषदेची शाळा पर्यावरण स्नेही, बोलकी व उपक्रमशील शाळा म्हणून तालुक्यासह जिल्हास्तरावर नावलौकिक मिळवलेली शाळा आहे. या शाळेने अनेक उपक्रम सादर करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाची शिदोरी दिली जाते. या दरम्यान, बोरगावची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रायगड जिल्ह्यामध्ये परसबाग तयार करण्यामध्ये सरस असल्याचे दिसून येत आहे.

पेण तालुक्यातील बोरगाव येथील रायगड जिल्हा परिषदेची शाळा ही उपक्रमशील शाळा आहे. पर्यावरण स्नेही व बोलकी उपक्रमशील शाळा उपक्रमांतर्गत शाळेच्या नाविन्यपूर्ण प्रयत्नांची साक्ष देते. शाळेच्या परिसरातील भिंती आणि झाडांच्या आजूबाजूच्या प्रत्येक जागेचा वापर विविध शैक्षणिक संकल्पना मांडण्यासाठी करण्यात आला आहे. बोरगाव शाळा आणि शालेय परिसर हे केवळ भौतिक घटक नसून ते शिक्षणाचे प्रभावी माध्यम बनू शकते, या विचारातून शाळेने ''बोलकी शाळा'' व ''शालेय परसबाग'' हा उपक्रम हाती घेतला होता. या उपक्रमाचा मूळ उद्देश विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी आवड निर्माण करणे, त्यांना कृतीतून शिकण्याची संधी देणे, शालेय परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे, याबरोबरच विद्यार्थ्यांना परिसरातील विविध प्रकारच्या वनस्पती व त्यांचा उपयोग प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देणे हा आहे. या शाळेच्या प्रांगणात विविध प्रकारच्या वनस्पती, औषधी वनस्पती, फळझाडे, फुलझाडे, शोभेची झाडे असून काही झाडांना क्यूआर कोड लावण्यात आले आहेत. स्कॅन करून त्या झाडांची प्रत्यक्ष माहिती मिळते. शाळा परिसरात आंबा, फणस, नारळ, केळी, पेरू, काजू, पपई, शेवगा, बदाम, सुपारी, अननस, आवळा, मलबेरी, कडुलिंब यासह वांगी, मिरची, भेंडी, कारले, मुळा, शिराळा, दुधी भोपळा, चवळी, घेवडा इत्यादी भाज्यांची लागवड शिक्षकाच्या मदतीने विद्यार्थ्यांनी केली आहे. त्या भाज्यांचा वापर मध्यान्ह भोजनात केला जातो. तसेच, शालेय परिसरात सेंद्रिय खत निर्मिती केली जाते व त्याचा वापर शालेय परिसरातील झाडांसाठी केला जातो.



त्याचबरोबर शालेय परिसरात अमृतवाटीका, वाचन कट्टा, सागरमित्र, प्लास्टिक पिंजरा, रेन हार्वेस्टिंग वॉटर यांसारखे उपक्रम तसेच भारताच्या नकाशात राज्ये व त्यांच्या राजधान्या दाखवण्यात आलेल्या आहेत. अशा विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांना शैक्षणिक अनुभव दिले जातात. यासाठी पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे, केंद्रप्रमुख, शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य मिळत आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांसह शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांचे विशेष सहकार्य वर्षभर लाभत असून सहकार्य ही तेवढेच केले जाते. एकंदरीत जिल्हा परिषद बोरगावची प्राथमिक शाळा रायगड जिल्ह्यामध्ये परसबाग तयार करण्यामध्ये सरस असल्याचे दिसून येत आहे.

अदानी आणि आदिवासी

पुन्हा मुख्यमंत्री झाल्यावर देवेंद्र फडणवीसांनी पहिले काय केले तर गडचिरोलीचे पालकमंत्रिपद स्वतःकडे घेतले. मागास भागाचा विकास करण्यासाठी हा नेता किती प्रयत्नशील आहे असे लोकांना त्यावेळी वाटले असेल. पण प्रत्यक्षात ही कळकळ गडचिरोलीतील आदिवासी, गरिबांसाठी नव्हती. ती होती अदानीसाठी. त्याला खाणी मिळाव्यात, त्याच्यासाठी रस्ते व्हावेत, लॉईडसारख्या कंपनीला कोणताही अडथळा न येता लोहखनिज उपसता यावे यासाठी हा आटापिटा अधिक होता. गडचिरोलीतील आश्रमशाळेत तीन मुलींचा साप चावून झालेला मृत्यू हे एका अर्थाने त्या पक्षपाती आट्यापिट्याचे बळी आहेत. पालकमंत्र्यांनी प्राधान्याने गरिबांसाठीच्या शाळा, दवाखाने यांच्या सोई नीट आहेत ना याकडे लक्ष द्यायला हवे. त्याऐवजी सरकारी यंत्रणा अदानी आणि मंडळींची सरबराई नीट करील यासाठी जुंपली गेली की असे बळी जातात. गडचिरोली किंवा राज्यभरातील आश्रमशाळांमधील गैरसोई आजच्या नाहीत. स्वातंत्र्याला ८० वर्षे पूर्ण होत असताना या शाळा अजूनही अठराव्या शतकात आहेत. त्याकडे आजवरच्या काँग्रेसी सरकारांनी केवळ चरण्याचे कुरण म्हणून पाहिले ही वस्तुस्थिती आहे. गडचिरोलीतील ज्या शाळेत सर्पदंशाची घटना झाली तीदेखील काँग्रेसचे माजी खासदार मारुतराव कोवासे यांचीच आहे. पण म्हणून भाजप आणि फडणवीस यांची यातून सुटका होऊ शकत नाही. त्यांच्या सरकारनेही आधीचीच परंपरा पुढे चालू ठेवली आहे असे म्हणता येते. काल मुलींचा मृत्यू झाल्यानंतर राज्यातील सर्व आश्रमशाळांमधील सुविधांचे ऑडिट करण्याचे फर्मान निघाले. पण हे यापूर्वीही अनेकदा झाले आहे. शिवाय, वेळोवेळी विधिमंडळ समित्यांनी यावर प्रकाश टाकलेला आहे. असे असूनही यात बदल होत नाही. एखाद्या उंच इमारतीला आग लागली की अशा इमारतींमध्ये आगरोधक यंत्रणा आहेत का याचे ऑडिट करण्याचे आदेश दिले जातात. सरकारने काहीतरी केले असे जनतेला वाटते. तसाच हा प्रकार आहे. गडचिरोलीत आश्रम शाळेऐवजी अदानीच्या प्रकल्पात अशी दुर्घटना घडली असती तर सगळी सरकारी यंत्रणा हलवली गेली असती. अतिशियोक्ती करायची तर गडचिरोली जिल्ह्यातले सगळे साप मारायचे फर्मान निघाले असते.

गरिबांहून गरीब जिणे

राज्यात एक हजारांहून अधिक आदिवासी आश्रमशाळा आहेत. त्यातल्या निम्म्या सरकारी तर बाकीच्या अनुदानित पण खासगी लोकांकडून चालवल्या जातात. यासाठी दरवर्षी सुमारे साडेपाच हजार कोटी रुपयांचा निधी खर्ची पडतो. पण या पैशांपैकी मुलांपर्यंत किती पोचतो हा प्रश्न आहे. मुले गरीब घरातील आहेत म्हणजे त्यांना जगवत ठेवले तरी त्यांच्यावर उपकार आहेत असा सर्व संस्थाचालक, सरकार इत्यादींचा दृष्टिकोन दिसतो. त्यामुळेच अत्यंत घाणेरड्या स्थितीत व वातावरणात ही मुले राहतात. सुमारे ८० टक्के शाळांमध्ये जिथे वर्ग भरतात तिथेच मुले झोपतात. त्यांच्यासाठी स्वतंत्र वसतिगृहे नाहीत. साठ टक्के शाळांमध्ये वीज नाही. शौचालये, पाणी यांची बोंब आहे. यांना कसेही अन्न पुरवले तरी चालते. शहरातील शाळांमध्ये माध्यान्ह भोजनात अंडी असावीत का किंवा पौष्टिक काय असावे वगैरे चर्चा चालतात. आदिवासी आश्रमशाळांमध्ये जेमतेम भाताची पेज उकडून दिली तरी मेहरबानी अशी स्थिती असते. त्यातही स्वच्छतेची काळजी घेतली जात नाही. मग या जेवणातूनच आजारांचा प्रसार होतो. आठच दिवसांपूर्वी अमरावती जिल्ह्यात आश्रमशाळांमध्ये मुलामुलींना अन्नातून विषबाधा झाल्याने इस्पितळात दाखल करावे लागले. सुदैवाने वेळीच उपचार झाल्याने अनवस्था प्रसंग टळला. पण असे प्रकार नित्य घडत असतात. गडचिरोलीतील ज्या शाळेत सर्पदंशाचा प्रकार घडला तिथे पलंगावर झोपण्याची सोय नव्हती. पावसाचे पाणी वाढले की साप वगैरे कोरड्या व उबदार जागांमध्ये शिरू पाहतात हा नेहमीचा अनुभव आहे. त्यामुळेच जंगल किंवा शेतातील घरांमध्ये जमिनीवर झोपू नका असे सांगितले जाते. या शाळेत पलंग नसल्याने मुली जमिनीवर झोपलेल्या होत्या. त्यामुळे सहा जणींना साप चावला. त्यातील तिघींवर उपचार चालू आहेत. तीन जणी गेल्या. अलिकडे पालघरमध्ये असाच प्रकार झाला होता. ज्या भागातील आश्रमशाळांची स्थिती इतकी वाईट आहे तिथे दवाखाने कशा प्रकारचे असतील याची कल्पना केलेली बरी. त्यामुळे सरकारला ही सगळी यंत्रणा सुधारावी लागेल. तीन मुलींना उपचारासाठी नागपुरात नेण्यात आले आहे. पण त्यांच्यावर गडचिरोलीत किंवा त्याहून जवळच्या तालुक्याच्या जागीच उपचार होऊ शकतील अशी इस्पितळे उभारण्याला प्राधान्य द्यायला हवे.


सीजेपीची मोहिम

केंद्रातील मोदी किंवा राज्यातील फडणवीस सरकारचा विकास नक्की कोणासाठी या प्रश्नाचे उत्तर देणारी ही घटना आहे. हा विकास केवळ बड्या उद्योगांसाठी आहे. विंचू, साप चावून माणसे नेहमीच मरतात किंवा नऊ महिन्यांच्या गर्भवतीला कित्येक मैल झोळीत घालून चालवत न्यावे लागते, उन्हाळ्यात पाण्यासाठी दशदिशा भटकावे लागते. सरकार त्याकडे लक्ष देण्याऐवजी या भागातील खाणींमधून पैसे कसे करता येतील व इथली जंगले तोडून इमारती कशा बांधता येतील याच्याच विचारात मग्न आहे. गडचिरोलीच्या घटनेत एका वेळी एकदम तीन मुलींना साप चावला म्हणून सर्वांचे लक्ष तिकडे गेले. मिडियात बातम्या झाल्या. अन्यथा, स्थानिक वृत्तपत्रात चार ओळींची बातमी येऊन विषय संपला असता. आता किमान या निमित्ताने राज्यातील सर्व आश्रमशाळा तसेच तसेच विद्यार्थी वसतिगृहे यांची झाडाझडती सरकारने घ्यावी आणि अदानीसाठी जशी धावपळ केली जाते तशा युध्दपातळीवर या सर्व शाळांची स्थिती सुधारण्यासाठई उपाय केले जावेत. अलिकडेच जंतरमंतरवर विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. त्यातला मूळ विषय नीटच्या पेपरफुटीचा होता. म्हणजे तो बराचसा मध्यमवर्गाशी संबंधित होता. तरीही देशभरातून अतिशय गरीब घरातले तरुण या आंदोलनाला आले. त्यांनी संसदेवरच्या मोर्चामध्ये सहभाग घेतला. याचे कारण शिक्षण हे त्या सगळ्यांचे मूळ दुखणे होते. आपल्याला मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग नाही, त्यातून नोकऱ्या मिळत नाहीत अशा तक्रारी एकीकडे होत्या. तसेच शहरातील मुलांच्या तुलनेत आदिवासी व गरीब घरातल्यांना पुरेशा सोईही मिळत नाहीत हा दुसरा भाग होता. म्हणूनच येत्या १५ ऑगस्टपासून कॉकरोच जनता पार्टीतर्फे गावागावातील सरपंचांकडे जाऊन तिथल्या शाळांमध्ये पुरेशा सोई आहेत का व नसतील त्यांच्यावर खर्च होणारा सरकारी पैसा नेमका कुठे जातो आहे याचा शोध घेण्याचे एक आंदोलन केले जाणार आहे. जंतरमंतरवर घोषणा देणे सोपे आहे. गावागावात जाऊन असा शोध घेण्याचे काम कठीण आहे. किमान काही शे गावांमध्ये जरी शाळांची स्थिती शोधून काढली गेली तरी आपल्या शिक्षणव्यवस्थेवर प्रकाश पडू शकेल. गडचिरोलीतील आश्रमशाळांसारख्या किती शाळा अशाच वाईट अवस्थेत आहे हे समाजापुढे येऊ शकेल. फडणवीसांचे सरकार कितीही घोषणाबाजी करीत असली तरी गरिबांची या व्यवस्थेतून लूटच होत राहते हे वास्तव या निमित्ताने सर्व जनतेला कळेल. अंध भक्तांचे उघडले तर डोळे उघडतील.

विचार

सोनेमागणी घटली, डेटा सेंटर्स वाढली

गेल्या काही दिवसांमधील पहिली खास बातमी म्हणजे अलिकडच्या काळात सोन्याच्या मागणीमध्ये मागील वर्षातील याच काळाच्या तुलनेत सहा टक्के घट पहायला मिळाली. दुसरी महत्वाची बातमी म्हणजे येत्या काळात भारताची डेटा सेंटर्स तब्बल सहापट वाढणार आहेत. तसा तपशील समोर आला आहे. तर अन्य महत्वाची बातमी म्हणजे चीनी अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती अलिकडे मंदावली असल्याचे दिसून आले आहे.



सरत्या आठवड्यामध्ये पुन्हा एकवार काही लक्षवेधी बातम्यांनी बाजारात तरंग उमटवले. पहिली महत्वाची बातमी म्हणजे अलिकडच्या काळात सोन्याच्या मागणीमध्ये मागील वर्षातील याच काळाच्या तुलनेत सहा टक्के घट पहायला मिळाली. दुसरी महत्वाची बातमी म्हणजे येत्या काळात भारताची डेटा सेंटर्स तब्बल सहापट वाढणार आहेत. तशी आकडेवारी समोर आली आहे. तर अन्य महत्वाची बातमी म्हणजे चीनी अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती अलिकडे मंदावली असल्याचे दिसून आले आहे.

'वर्ल्ड गोल्ड कौन्सिल' (डबल्यूजीसी) नुसार, एप्रिल-जून तिमाहीमध्ये भारतात सोन्याची मागणी वार्षिक आधारावर सहा टक्क्यांनी घटून १३१.४ टन झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ही मागणी १३९.७ टन होती. मागणीतील या घसरणीमागे उत्पादनशुल्कात वाढ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोन्याची खरेदी कमी करण्याच्या केलेल्या आवाहनाला मुख्य कारण मानले गेले आहे. केंद्र सरकारने याच वर्षी मे महिन्यात सोने आणि चांदीच्या आयातीवरील शुल्क सहा टक्क्यांवरून वाढवून १५ टक्के केले होते. यामुळे त्यांच्या किमती वाढल्या होत्या. 'डबल्यूजीसी इंडिया'चे प्रादेशिक 'सीईओ' सचिन जैन यांनी सांगितले, की मागणी घटली असली तरी, मूल्यानुसार हा एक विक्रम आहे. या तिमाहीमध्ये सोन्याचा खप एक लाख ९८ हजार शंभर कोटी रुपयांचा राहिला. तो २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीतील एक लाख ३२ हजार पाचशे कोटी रुपयांच्या तुलनेत ५० टक्के अधिक आहे. यावरून दिसून येते, की वाढलेल्या किमती असूनही ग्राहक सोन्याला प्राधान्य देत आहेत.

एप्रिल-जून तिमाहीमध्ये भारतात दागिन्यांची मागणी १५ टक्क्यांनी घटून ७५.१ टन झाली. मागील वर्षी याच कालावधीमध्ये ही मागणी ८८.८ टन होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मे महिन्यात लोकांना अनावश्यक सोन्याची खरेदी कमी करून परकीय चलन साठा वाचवण्याचे आवाहन केले होते. त्याचा परिणाम बाजारात दिसून आला आहे. दुसऱ्या तिमाहीमध्ये सोन्याची सरासरी आंतरराष्ट्रीय किंमत ४,५०६.३ डॉलर प्रति औंस होती. २०२५ मध्ये याच काळात ती ३,२८०.४ डॉलर होती. भारतात सरासरी तिमाही किंमत (आयात शुल्क आणि जीएसटी वगळून) एक लाख पन्नास हजार ७४४.८ रुपये होती, तर मागील वर्षी याच काळात ती ९४ हजार ८७५.९ रुपये होती. 'डबल्यूजीसी'ने या वर्षी एकूण मागणी ६५० ते ७५० टन दरम्यान राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. जैन यांच्या मते सणासुदीच्या आणि लग्नाच्या हंगामात मागणी वाढण्याची अपेक्षा आहे. अहवालानुसार, एप्रिल-जून तिमाहीमध्ये जागतिक स्तरावर सोन्याची मागणी १,२६९ टन इतकी राहिली. यात मागील वर्षाच्या तुलनेत कोणताही विशेष बदल झाला नाही. २०२५ च्या याच तिमाहीमध्ये सोन्याची एकूण मागणी १,२६८.६ टन होती. आता वळू या आणखी एका दखलपात्र बातमीकडे. कृत्रिम बुद्धिमत्ते(एआय) चा वेगाने वाढणारा वापर, 'क्लाउड' पायाभूत सुविधांमधील मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूक आणि डिजिटल अर्थव्यवस्थेच्या जोरावर भारताची डेटा सेंटर क्षमता २०२५ मधील २.२ गिगावॉटवरून वाढून २०३० पर्यंत १२ गिगावॉटपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. 'वूड मॅकेन्झी'च्या अहवालानुसार, 'एआय'साठी समर्पित डेटा सेंटर क्षमता २०२५ मधील २७५ मेगावॉटवरून वाढून २०३० पर्यंत ६,५४६ मेगावॉट होण्याचा अंदाज आहे, तर डेटा सेंटरची विजेची मागणी २०२५ मधील १० टेरावॉट-तास (टीडब्ल्यूएच) वरून वाढून २०४० पर्यंत १९१ टेरावॉट-तास होण्याचा अंदाज आहे. 'वूड मॅकेन्झी'चे संशोधन सहयोगी सौहार्द पाल यांनी सांगितले, की भारताची डेटा सेंटर बाजारपेठ दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी महत्त्वाच्या संधीचे केंद्र म्हणून उदयास येत आहे. मोठ्या प्रमाणातील भांडवली गुंतवणूक, 'एआय' आधारित कामांमधील वाढ आणि गेल्या दशकातील धोरणात्मक पाठिंब्यामुळे भारत आशिया-प्रशांत क्षेत्रातील प्रमुख बाजारपेठांच्या बरोबरीने उभा राहिला आहे. आता व्यावसायिक आणि गुंतवणूकदारांसाठी भारतात गुंतवणूक करावी की नाही, हा प्रश्न राहिलेला नाही तर गुंतवणूक कुठे आणि कशी करावी हा प्रश्न आहे. अहवालानुसार २०२५ मध्ये ३२ लाख कोटी रुपये मूल्याची आणि सकल राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) सुमारे १२ टक्के वाटा असणारी भारताची डिजिटल अर्थव्यवस्था डेटा सेंटर पायाभूत सुविधांची मागणी वाढवत आहे. देशात १०३ कोटींहून अधिक सक्रिय इंटरनेट वापरकर्ते आहेत आणि दरमहा सुमारे २,२०० कोटी 'यूपीआय' व्यवहार केले जातात. भारताची अंतर्गत 'एआय' बाजारपेठ २०३२ पर्यंत ११.७ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. अहवालात नमूद केले आहे, की महाराष्ट्र आणि तामिळनाडू सध्या देशातील एकूण स्थापित माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षमतेच्या सुमारे ६५ टक्के वाटा व्यापतात; मात्र भविष्यात आंध्र प्रदेश, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि कर्नाटकमध्ये गुंतवणूक वाढण्याची शक्यता आहे. या नव्या बाजारपेठा जागतिक स्तरावरील मोठ्या क्लाउड सेवा कंपन्यांकडून मोठी गुंतवणूक आकर्षित करत आहेत. यामध्ये ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस आणि गूगल व्यतिरिक्त देशांतर्गत अदाणी कॉननेक्स कंपनीचा समावेश आहे, जिने २.६ गिगावॉट क्षमतेच्या विकास प्रकल्पांची घोषणा केली आहे. अहवालानुसार, विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या दरात विजेची उपलब्धता ही आता डेटा सेंटर उद्योगासमोरील सर्वात मोठी आव्हानात्मक बाब ठरत आहे.

महेश देशपांडे

येथे आणखी एका महत्वपूर्ण बातमीकडे वाचकांचे लक्ष वेधायला हवे. अलिकडच्या काळात चीनच्या अर्थव्यवस्थेचा वेग मंदावल्याचे चित्र समोर आले असून, वर्षाच्या उर्वरित महिन्यांत सरकारी खर्चाला गती देण्याचे आणि आवश्यकतेनुसार नवीन धोरणात्मक पावले उचलण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. देशातील व्यावसायिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे आणि नागरिकांची खरेदी क्षमता वाढवणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. एप्रिल ते जून २०२६ या तिमाहीत चीनचा आर्थिक विकासदर ४.३ टक्के नोंदवला गेला आहे. गेल्या तीन वर्षांहून अधिक काळातील ही सर्वात मंद गती आहे. हा आकडा सरकारने संपूर्ण वर्षासाठी ठरवलेल्या साडेचार ते पाच टक्के या उद्दिष्टापेक्षाही कमी आहे. चीनच्या सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षाच्या सर्वोच्च 'पोलित ब्यूरो'ने देशाची अर्थव्यवस्था सध्या कठीण टप्प्यातून जात असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे सरकार आता नागरिकांची खरेदी क्षमता आणि मागणी वाढवण्यावर भर देणार आहे. तथापि, सध्या कोणत्याही नवीन मोठ्या आर्थिक पॅकेजची घोषणा करण्यात आलेली नाही. सध्या सरकार अचानक मोठ्या प्रमाणात निधी जाहीर करण्याऐवजी अत्यंत विचारपूर्वक आणि टप्प्याटप्प्याने पावले उचलण्याच्या भूमिकेत आहे. कारखान्यांमधील गरजेपेक्षा जास्त उत्पादन, वस्तूंच्या घसरणाऱ्या किमती आणि स्थानिक प्रशासनावरील वाढता कर्जाचा डोंगर यांसारख्या गंभीर समस्यांवर नियंत्रण मिळवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

कंपन्यांमध्ये उत्पादने अत्यंत स्वस्त दरात विकण्यासाठी होत असलेल्या स्पर्धेबाबत सरकारने चिंता व्यक्त केली आहे. या स्पर्धात्मक दरांमुळे कंपन्यांचा नफा घटत असल्याचे सांगत अशा प्रकारच्या 'प्राइस वॉर'ला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या जातील, असे सरकारने स्पष्ट केले आहे. व्यापाराला पाठबळ देणे, बाजारातील मागणी वाढवणे आणि अर्थव्यवस्थेला पुन्हा पूर्वपदावर आणण्यासाठी उर्वरित वर्षात सरकारी खर्चाचा वेग वाढवला जाईल, असे प्रशासनाने नमूद केले आहे.

चर्चा आजची

पुन्हा नारळ फोडीची स्पर्धा रंगणार?

पुन्हा एकदा अलिबाग-रोहा मेगा रोड प्रकल्प चर्चेचा विषय ठरत आहे. २०१९ मध्ये सुरू झालेला तब्बल १७७.७९ कोटी रुपयांचा हा प्रकल्प सात वर्षांनंतरही पूर्णत्वाला गेलेला नाही. अलिबाग आणि रोहा या दोन तालुक्यांना जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग अनेक वर्षांपासून अरुंद आणि वाहतुकीच्या दृष्टीने त्रासदायक ठरत आहे. गेल्या अनेक वर्षांत या रस्त्याच्या कामाची सुरुवात अनेकदा झाली. भूमीपूजनासह नारळफोडीचे कार्यक्रमही अनेकदा झाले; मात्र प्रत्यक्ष रस्त्याचे काम अपेक्षित गतीने पूर्ण झालेले नाही. त्यामुळे पुन्हा एकदा या मार्गासाठी नारळफोडीची स्पर्धा रंगणार का? असा प्रश्न या मार्गावरील प्रवासी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

अलिबाग-रोहा हा मार्ग अलिबागवरून रोहा येथे जाण्यासाठी जवळचा आणि महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, हा मार्ग अरूंद असल्यामुळे एकावेळी दोन वाहने पास होणे जिकरीचे होत असे. त्यामुळे अलिबाग-रोहा रस्त्याच्या कामासाठी तब्बल १७७.७९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे काम गुजरातमधील अग्रवाल यांच्या मेसर्स जेआरए प्रकल्प प्रा.लि. या संस्थेला देण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत अलिबाग-रोहा-साई (माणगाव) या सुमारे ८५.६३ किलोमीटर मार्गाचे दुपदरीकरण करण्यात येणार आहे. त्यातील सुमारे अलिबाग-रोहा हा रायगड जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. रस्ता अपूर्ण, पूल अपूर्ण आणि प्रवाशांचा त्रास कायम असताना प्रकल्पातील कागदोपत्री आर्थिक व्यवहारांनी आता नवा प्रश्न निर्माण केला आहे. उपलब्ध कागदपत्रांनुसार, संबंधित ठेकेदाराला तब्बल १०६ कोटी रुपयांचे बिल देण्यात आले आहे. त्यातच गुजरातमधील संबंधित कंपनीकडून काम काढून घेण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा सार्वजनिक बांधकाम विभागात आहे. त्यामुळे १७७ कोटींचा हा प्रकल्प पुन्हा नव्या निविदेच्या विळख्यात अडकण्याची शक्यता असून, रस्त्याचे काम आणखी लांबण्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, आता संबंधित कंपनीचा ठेका काढून पुन्हा उपनिविदा काढली गेल्यास 'रस्ता पूर्ण कधी होणार?' हा प्रश्न पुन्हा अनुत्तरित राहण्याची शक्यता आहे. निविदा प्रक्रियेतच प्रकल्प पुन्हा अडकला, तर नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कागदोपत्री प्रगतीपेक्षा प्रत्यक्ष कामाला वेग देण्याची मागणी जोर धरत आहे.



संतोष राऊळ

तसेच, या मार्गावर तब्बल २३ पुलांची नव्याने उभारणी करण्यात येणार आहे. वढाव ते खानाव मार्गावरील दोन पुलांची कामे सुरू करण्यात आली असली तरी तीदेखील अद्याप अपूर्ण आहेत. रस्त्याचे रखडलेले काम, अपूर्ण पूल आणि निकृष्ट बांधकामाच्या तक्रारींमुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. रस्ता आणि पुलांची कामे नेमकी कधी पूर्ण होणार, असा सवाल प्रवासी आणि स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रस्त्याचे सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा केला जात आहे. मात्र, संबंधित गुजरातमधील कंपनीकडून काम काढून घेण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा विभागातच आहे. ठेका काढून घेतल्यास उर्वरित कामासाठी पुन्हा नव्याने उपनिविदा काढावी लागणार आहे. त्यामुळे आधीच वर्षानुवर्षे रखडलेल्या या रस्त्याच्या कामाला आणखी किती काळ लागणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

गेल्या काही वर्षांत या रस्त्यासाठी अनेक नारळ फोडले गेले. त्याचा लोकप्रतिधींनी गाजावाजा देखील केला. तसेच, एकाच वेळी दोन सत्ताधिकारी पक्षांनी नारळ फोडले. त्यानंतर नुकतेच बेलकडे फाट्यावर नारळ फोडून भूमिपूजन करण्यात आले. त्यामुळे एवढे नारळ फोडूनही या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांच्या माथी खडतर प्रवास येत आहे. काही महिन्यांपूर्वी या मार्गावरील खानाव परिसरातील दोन पुलांवर अपघात घडले आहेत. त्यातील एका पुलाचे मधोमध दोन तुकडे झाले, तर दुसऱ्या पुलाला भले मोठे भगदाड पडले. या भगदाडामुळे एका स्थानिक रहिवाशाचा नाहक बळी गेला. या मार्गावरून लोकप्रतिनिधींची अनेक वेळा रेलचेल सुरू असते. त्यावेळी त्यांना या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्यांच्या समस्या दिसत नाही. जेव्हा एखादी दुर्घटना घडते त्यावेळी ते त्या ठिकाणी हजेरी लावतात. एखादा पुल पडला आणि तो पुन्हा उभारला गेला की स्वतःला श्रेय देतात. चांगल्या कामाचं श्रेय घेण्यास कोणताही मज्जाव नाही; परंतु, अपघात किंवा दुर्दैवी घटना घडते तेव्हा त्याचं श्रेय देखील त्यांनी घ्यावं, असे सर्व सामान्यांमधून बोलले जात आहे.

आताची अलिबाग-रोहा रस्त्याची परिस्थिती आणि ठेकेदार बदलण्याच्या हालचाली पाहता हा रस्ता पुर्णत्वास जाण्यास अजुन काही वर्षांचा कालावधी लोटण्याचे चिन्ह दिसत असल्याचे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे. त्यामुळे पुढील काही वर्ष तरी प्रवासी वर्गाच्या माथी खडतर प्रवास असल्याचे बोलले जात आहे. जर हा मार्ग २०२९च्या निवडणूकींपूर्वी पुर्णत्वास गेला नाही, तर पुन्हा एकदा या मार्गावर नारळ फोडाफोडीची स्पर्धा रंगतील, असे सर्वसामान्यांसह प्रवासी वर्गातून बोलले जात आहे.

लोकसंस्कृती

निखळ मनशांती, नवचैतन्य मिळवून देणारा श्रावण!

आजपासून म्हणजे श्रावण शुक्ल प्रतिपदेपासून श्रावण महिन्याची सुरुवात होत आहे. निसर्गाची सुंदर किमया आणि संस्कृतीचा सुवर्णसंगम म्हणजे श्रावण मास! श्रावण महिना सुरू होताच मनात आणि संपूर्ण वातावरणात एक वेगळाच उत्साह आणि सात्त्विकता निर्माण होते. ऊन-पावसाचा लपंडाव, धरतीने पांघरलेली हिरवी शाल आणि हवेतील सुखद गारवा मनाला सुखद शांतता देऊन जातो. शुद्ध, सात्विक आणि पावित्र्याने भारलेला श्रावण महिना भगवान शंकरांना समर्पित असल्यामुळे अत्यंत पवित्र मानला जातो. संपूर्ण महिनाभर पूजा, व्रत वैकल्ये, उपवास आणि मंगळागौरी सोबतच एकापाठोपाठ येणारे नागपंचमी, नारळीपौर्णिमा, रक्षाबंधन, श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि गोपाळकाला अशा सणांमुळे कौटुंबिक जिव्हाळा वाढत जातो. घरोघरी होणारे पूजनाचे विधी, मंत्रोच्चार आणि अगरबत्तीच्या सुगंधाची दरवळ यामुळे संपूर्ण वातावरण मांगल्याने भारून जाते. दुसरीकडे हिरव्या रंगाने न्हाऊन निघालेल्या धरित्रीवर सर्वत्र पारिजातक, सोनचाफा, बकुळी, सायली, सोनटक्का अशी नानाविध रंगांची फुले उमलतात आणि सप्तरंगांची उधळण होते. कडेकपाऱ्यातून धबधबे ओसंडून वाहत असतात. सर्वत्र वृक्षवल्ली आनंदाने डोलत असतात. चराचरात सर्वत्र चित्तवृत्ती उल्हसित करणारे वातावरण असल्यामुळे पशुपक्षी, प्राणिमात्रही सुखावून जातात. त्यामुळे आजच्या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात निखळ मनशांती, आत्मिक समाधान आणि नवचैतन्य मिळवून देणारा श्रावण महिना सर्वांनाच हवाहवासा वाटतो. **– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला.

अवघ्या आठ वर्षाची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षाचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह झाला. लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली.

इ.स.१७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून अहिल्याबाईने प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रूढी, परंपरा यापलिकडे कर्तव्य महत्त्वाचे माणून रयतेला कल्याणकारी राज्य दिले. मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर २९ वर्षे अत्यंत यशस्वीपणे खऱ्या कल्याणकारी योजना काय असू शकतात आणि त्या कशा राबवल्या जाव्यात हे त्यांनी दाखवून दिले. त्यांनी आपल्या आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक विहिरी, तलाव, कुंड, घाट बांधले आहेत. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते ते काम लोकमाता अहिल्याबाईंनी केले. उद्योगधंद्यांना व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले. सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, मशिदी, दर्गे व विहार बांधली. तर काही मंदीरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरा सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन!

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ ऑगस्ट

१) श्री. दिनानाथ मसणाजी पाटील हाशिवरे, अलिबाग, १३-८-१९३६
२) श्रीम. आशा गजानन पाटील अलिबाग, १३-८-१९४८
३) श्री. विजय वसंत लेले वेश्वी, अलिबाग, १३-८-१९५४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

वाहतूक कोंडीची समस्या कायम

● तोडगा काढण्यात शासकीय यंत्रणा अपयशी

। चिरनेर । विशेष प्रतिनिधी ।

पुणे-गोवा महामार्गाला जोडणारा गव्हाण फाटा ते चिरनेर दरम्यानच्या रस्त्यावर सातत्याने तासन्तास होणारी वाहतूकीची कोंडी वाहनचालकांचा अंत पाहाणारी ठरु लागली आहे. यावर अद्यापही तोडगा काढण्यात शासकीय यंत्रणा अपयशी ठरली आहे. यामुळे वाहनचालक तसेच प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

गव्हाणफाटा-चिरनेर हा रस्ता पुणे, कोकण, गोव्याला जोडणारा उपयुक्त शार्टकट म्हणून सर्वांनाच परिचित आहे. या मार्गावरील गव्हाण फाटा ते खारपाडापर्यंत ४० हून अधिक कंटेनर यार्ड आहेत. त्यामुळे या मार्गावर अहोरात्र अवजड कंटेनर वाहनांची वर्दळ असते. त्यामध्ये कोकण, गोवा महामार्गाकडे दररोज ये-जा करणाऱ्या वाहनांचीही संख्या २५



हजाराच्या घरात आहे. अवजड कंटेनर वाहनांची वर्दळ आणि इतर वाहनांमुळे गव्हाणफाटा-चिरनेर हा रस्ता आता वाहतुक कोंडीचा महामार्ग ठरु लागला आहे.

गव्हाणफाटा-जांभूळपाडा-दिघोडे-रानसई चौकापर्यंतच्या रस्त्यावर दुतर्फा मार्गावर अवजड कंटेनर वाहने मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या पार्किंग केली जातात. बेशिस्तपणे पार्किंग करण्यात येणाऱ्या अवजड वाहनांमुळे मात्र वाहनांच्या रांगा लागतात. कधीकधी तर या मार्गावर उपचारासाठी रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकांही अडकून पडतात. यामुळे रुग्णांना जीवाशी खेळ होतो. अपघातांच्या संख्येतही मोठी वाढ झाली आहे.

याआधी तीन वर्षापूर्वी डबल कंटेनरच्या वाहतूकीसाठी मध्य रेल्वेने गव्हाण फाटा ते चिरनेर रस्त्यादरम्यान उंची वाढविण्यासाठी जुना ओव्हरहेड पूल तोडून नवा बांधला आहे. या दरम्यान या मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या आणखीनच गंभीर स्वरूपाची झाली होती. रेल्वेच्या नवा पुलाचे काम झाल्यानंतर तरी वाहतूक कोंडीच्या समस्येत सुधारणा होईल अशी अपेक्षा होती. मात्र अपेक्षा किमान या घडीपर्यंत तरी फोल ठरली आहे.

या मार्गावर होणारे अपघात व वाहतूक कोंडीची समस्या कायमची सोडविण्यासाठी स्थानिकांनी अनेक वेळा आंदोलनेही केली आहेत. मात्र, या समस्येवर ठोस उपाययोजना करण्यात संबंधित सर्वच शासकीय यंत्रणा सपशेल अपयशीच ठरलेल्या आहेत. यामुळे वाहनचालकांमध्ये प्रचंड प्रमाणात असंतोष व्यक्त केला जात आहे.

यामुळे होतेय कोंडी

अवजड कंटेनर वाहतूकीसाठी असणारे अपुरे, अरुंद रस्ते, पायाभूत सुविधा, अवजड व कंटेनर वाहतूक होणाऱ्या महत्वाच्या रस्त्यांवरील बेकायदा दुतर्फा पार्किंग, दूरुस्ती आणि इतर पायाभूत प्रकल्पांची कामे, बेशिस्त वाहनचालक, वाहतूक पोलीस नियंत्रण विभागाकडून होणारी बेफिकीरी व नियंत्रणाचा अभाव आदी कारणे वाहतूक कोंडी व वाढत्या अपघातांना कारणीभूत ठरत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

> **"या मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या मार्गदर्शनाखाली संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात येणार आहे.**
> **– संजय पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरण वाहतूक नियंत्रण विभाग"**

नुकसानाचे तातडीने पंचनामे करण्याची मागणी

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतीसह शेतातील बांध-बंदिस्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची तातडीने नोंद घेऊन पंचनामे करण्यात यावेत. तसेच, पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई व इतर शासकीय मदत मिळावी, अशी मागणी वरदविनायक शेतकरी सामाजिक संस्था, खानाव यांच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत संस्थेच्या माध्यमातून नायब



तहसीलदार, खालापूर यांना निवेदन देण्यात आले.

अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील बांधबंदिस्ती वाहून गेल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, या नुकसानीची योग्य प्रकारे नोंद व पंचनामे न झाल्यास संबंधित शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे महसूल विभागाने तातडीने पाहणी करून नुकसानग्रस्त बांधबंदिस्तीचे पंचनामे करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तर अनेक शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमध्ये त्यांच्या मालकीच्या काही सातबारा उताऱ्यांची नोंद झालेली नाही. त्यामुळे विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. संबंधित सातबारा उताऱ्यांची पडताळणी करून ते फार्मर आयडीशी जोडण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. तसेच शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीसंदर्भातील अडचणी तातडीने दूर करण्यासाठी तालुकास्तरावर विशेष शिबीर आयोजित करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं	क्षेत्र हे. आर. पॉ	आकार रुपये	आकार पैसे
राघो कमळु केवारी	१५	७	०-४३-०	०	४०
	१५	८	०-३९-०	०	३०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १३/०८/२०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिल १) श्री.नरेश बबन हजारे, २) श्री.दत्तात्रेय पंढरीनाथ रूठे, ३) श्री. विक्रम प्रदीप पाटील, ४) श्री. सागर संतोष बोराडे यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. रिमेशबाबू कल्लारीकांन्डी कुबुंमब्रिथ, राहणार मौजे २१०१, ए आदी अल्लुरे, पोलिस स्टेशन जवळ, कांजुरमार्ग पुर्व, पो. भांडूप पुर्व मुंबई सदर्बन पिन कोड ४०००४२ यांच्या कडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

मिळकतीचे वर्णन

गावाचे नाव	भूमापन क्रमांक व उपविभाग	एकूण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी	आकार रू. पै
मौजे अंत्राट तर्फे वरेडी ता. कर्जत, जि. रायगड	१०९/२	०.७४.००	०.३३

वरील वर्णनाच्या कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक हितसंबंध असेल तर संबंधितांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) कळवावे वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्या इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. १३.०८.२०२६

ॲड. यज्ञेश अनंत भागवत
रा. फ्लॅट नं. १०१, पाल टॉवर, भिसेगाव, ता. कर्जत जि. रायगड.
मो. नं. ९३०७८८५७११

जाहीर नोटीस
मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो.. माणगाव यांचे न्यायालयात
ज.नों.प्रस्ताव क्र.१७८/२०२६

१. दिनेश महीपत उभारे, रा. कळमजे, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, बामणोली, ता. माणगाव, जि. रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड — सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत बामणोली, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी संजना दिनेश उभारे, रा. कळमजे, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०५/०३/१९९१ रोजी मौजे कळमजे, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

त्यांनी संजना दिनेश उभारे, रा. कळमजे, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०५/०३/१९९१ रोजी मौजे कळमजे, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप बामणोली, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, बाम णोली, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

संजना दिनेश उभारे, रा. कळमजे, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, बामणोली यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास संजना दिनेश उभारे, रा. कळमजे, ता.माणगाव, जि.रायगड यांचा जन्म दि.०५/०३/१९९१ रोजी मौजे कळमजे, ता.माणगाव, जि.रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण: माणगाव
दिनांक : ०४/०८/२०२६

सही/-
(विपीन लोकरे)
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार माणगाव

JANATA SHIKSHAN MANDAL'S
ADVOCATE DATTA PATIL COLLEGE OF LAW
TALUKA - ALIBAG, DISTRICT - RAIGAD, PIN - 402 201
APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FROM THE ACADEMIC YEAR 2026-2027.
UN-AIDED

Sr. No	Cadre	Subject	Total No. of Posts	Post for Reserved for
1	Principal	---	01	01 - OPEN
2	Assistant Professor	Law	05	SC/ST-01, DT(A)-01, SEBC/EWS-01, OPEN- 02 Horizontal Reservation - Women 01 Post (Open -01)
3	Assistant Professor	History	01	01-OPEN
4	Assistant Professor	English	01	01-OPEN
5	Assistant Professor	Economics	01	01-OPEN
6	Assistant Professor	Political Science	01	01-OPEN
7	Assistant Professor	Sociology	01	01 - OPEN
8	Librarian		01	01 - OPEN

The posts for the reserved category candidates will be filled by the same category candidates. (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.

Reservation for women will be as per University Circular No. BCC/16/741998 dated 10th March, 1998, 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Government of Maharashtra Resolution No. Misc-2018/C.R.56/18/UNI-1, dated 8th March, 2019 and University circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26th March, 2019 and revised from time to time" The Government Resolution & Circular are available on the website: mu.ac.in

Applicants who are already employed must send their application through proper channel. Applicants are required to account for breaks, if any in their academic career.

Applications with full details should reach the CHAIRMAN, JANATA SHIKSHAN MANDAL'S, ADV DATTA PATIL COLLEGE OF LAW, ALIBAG-402 201 Within 15 days from the date of publication of this advertisement. This is University approved advertisement.

Sd/-
Chairman,
Advocate Datta Patil College of Law

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

RFX	Description	Esti. Cost
Tend-26/26-27 7000041103	SITC, 22kV feeder bay for M/s Director TATA Memorial Centre, at suvery No. 1A/1A, at village Tambati, Tal-Khalapur, Dist. Raigad from 220kV Tambati S/stn under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/-+GST**	Rs. 43.43 Lakhs including taxes.

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 12.08.2026 at 11:00 Hrs. to 27.08.2026 up to 11:00 hrs, Opening date:-27.08.2026 @11:30 Hrs.** For further details visit our website h**ttps://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Mobile No. 8412050202, E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER
EHV (O&M) CIRCLE, PANVEL

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E–TENDER NOTICE (THIRD CALL)

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

Sr. No.	Tender / Notice No.	Particulars of Tender	Estimated Cost of Tender
1	**Tender No:- EE/EHV (O&M) / DIVN/MHD/Tech/E-Tender-14/IIIrd Call/2026-27 Dtd. 13.08.2026. RFX No. 7000041128**	**Sub:- Third Call** for SRM E-Tender for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M Dn. Mahad for the year 2026-27.	**Rs. 20,00,000/- (including GST + 1% Labour CESS)**
2	**Tender No:- EE/EHV (O&M / DIVN/MHD/ Tech/E-Tender-15/IIIrd Call/2026-27 Dtd.13.08.2026 RFx No. –7000041140**	**Sub:- Third Call** for SRM E-Tender for AMC of Air Conditioners at various substations under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2026-27.	**Rs. 7,50,000/- (including GST + 1% Labour CESS)**

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from 13.08.2026 @ 00:00 hrs to 22.08.2026 @ 23:59 Hrs for above tender.
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**
Contact Person :- The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
Note: All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV(O&M) Dn. Mahad

प्रविण मरवडेंची अध्यक्षपदी निवड

खांब : द.ग. तटकरे विद्यालय कोलाड येथे रविवारी (दि.९) रोहा तालुका शिक्षकेतर सेवक संघाची सभा पार पडली. यावेळी रा.जि. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर कर्मचारी संघातर्फे श्रमिक विद्यालय चिल्हे येथील प्रविण मरवडे यांची दुसऱ्यांदा रोहा तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी सुर्यकांत जाधव गु.रा. अग्रवाल विद्यामंदिर नागोठणे, सचिव विजय महाडिक द.ग.तटकरे विद्यालय कोलाड, सहसचिव निवृत्ती आंबेतकर आदर्श माध्यमिक विद्यालय कुडली तर खजिनदारपदी राम म्हात्रे, रामभाऊ वागळे विद्यालय धामणसई यांची निवड करण्यात आली.

सुमतीबाई देव विद्यालयाचे यश

खरोशी : पेण शिक्षण महिला समितीच्या श्रीमती सुमतीबाई वि.देव प्राथमिक विद्यालय पेण या शाळेने शिष्यवृत्ती परीक्षेत आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या अंतिम गुणवत्ता यादीत एकूण २२ विद्यार्थ्यांनी स्थान मिळवून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. इयत्ता ४ थीचे १६ विद्यार्थी व इयत्ता ७ वीचे ६ विद्यार्थी गुणवत्ता यादीत स्थान मिळवून घवघवीत यश संपादन केले.

प्रियांका लोखंडे पुरस्काराने सन्मानित

। माथेरान । प्रतिनिधी।

माथेरानच्या कन्या प्रियांका रमेश लोखंडे यांना पुणे येथे रविवारी (दि.९) नालंदा फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय सह्याद्रीरत्न पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने आदर्श उद्योजिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. समीर नाना गोडबोले यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन प्रियांका लोखंडे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर नालंदा संस्थेचे संस्थापक दीपक जाधव त्याचप्रमाणे अन्य मान्यवर उपस्थित होते. प्रियांका यांनी नुकताच नवनवीन मराठी सिरीयलमध्ये सुध्दा आपले करियर सुरू केले आहे.

निवडक



माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

चिरनेर : कोएसोच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या चिरनेरच्या बारावी ९३-९४ च्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रानसई धरणाजवळ असलेल्या गोकुळदास माळी फार्महाउस येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या स्नेहमेळाव्यात एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. ३२ वर्षांनंतर हे सर्वजण एकत्र आले होते. यामध्ये किर्तनकार, शिक्षक, मॅनेजर, माजी सैनिक, माजी सभापती, कंपनीत, काही सरकारी अधिकारी, व्यवसायिक, मुख्याध्यापक, गृहिणी, कलाकार, नाटककार, गायक, नोकरदार अशा विविध क्षेत्रात काम करणारीही मंडळी अगदी आपुलकीने जमा झाली होती. यावेळी प्रत्येकाने आपआपला परिचय दिला. यात प्रत्येकाने आपल्या खडतर प्रवासाचा सविस्तर आढावा घेतला. ग्रुपच्या मार्फत प्रत्येकाचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. पुन्हा एकदा जमा झालेल्या मित्र मैत्रिणींनी सर्वांना पुन्हा भेटू असे म्हणत निरोप घेतला.



पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

नवी मुंबई : वेदगंगा सहकारी पतसंस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि.९) सकाळी ११ वाजता डॉ. बाळकृष्ण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सानपाडा सेक्टर १० मधील बिलवर समुदाय सभागृहामध्ये पार पडली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गोदी कामगार नेते आणि सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव यांनी मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, शासनाच्या अनेक आव्हानांना सामोरे जाऊन संस्थेने आपली आर्थिक वाटचाल फार चांगली ठेवली आहे. सभासदांना चांगली सेवा देण्याचे काम संस्थेचे संचालक व कर्मचारी करतात. संस्थेचे सभासद ३२१८ असून यावर्षी संस्थेची वार्षिक उलाढाल २७ कोटींची असून ३२ लाख रुपये संस्थेला निव्वळ नफा झाला आहे. यावर्षी संचालक मंडळांनी सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर केला आहे. संस्थेतर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली जाते, हे निश्चितच कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी सांगितले.



विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप

पाली/गोमाशी : काळभैरव उत्साही मंडळ, राजमुद्रा प्रतिष्ठान आणि भार्जे ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.९) येथील शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले. वाटप करण्यात आलेल्या किटमध्ये वह्या, पेन, पेन्सिल, स्केल, कंपास पेटी यासारखे शालेय साहित्य होते. या सामाजिक उपक्रमाचे आयोजन काळभैरव उत्साही मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद धनावडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राजमुद्रा प्रतिष्ठान भार्जेचे कार्याध्यक्ष शंकर शिंदे, अध्यक्ष नितीन कोंडे, सरपंच चिंतामणी सुतार, अध्यक्ष चंद्रकांत गोफण, तृप्ती जगताप, प्रा. कणघरे तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजसेवक दिलीप धनावडे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी झाला. शिक्षणासाठी लागणाऱ्या साहित्याची कोणत्याही विद्यार्थ्याला कमतरता भासू नये, हा या उपक्रमामागचा उद्देश असून गावातील सर्व विद्यार्थी चांगले शिक्षण घेऊन मोठे व्हावेत, यासाठी मंडळ आणि प्रतिष्ठान नेहमीच प्रयत्नशील राहतील, असेही आयोजकांनी यावेळी सांगितले.

पंचरत्न इंग्लिश मिडियम स्कूलचे यश

उरण : रयत शिक्षण संस्थेचे पंचरत्न इंग्लिश मिडियम स्कूल, पिरकोनच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. इयत्ता ४ थी मधील अवनी विकास गावंड हिने १९४ गुण, इयत्ता ५ वीमधील आर्य निलेश म्हात्रे याने १७४ गुण, तर इयत्ता ७ वीमधील विधेश सदाशिव जोशी याने २३४ गुण मिळवून शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले आणि रायगड जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत येण्याचा बहुमान मिळवला आहे. त्यांच्या या यशामुळे शाळेचे नाव उज्ज्वल झाले असून परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोलाचा वाटा आहे. शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



आयुष हॉस्पिटलमध्ये सी.एन.इ. परिषद

कोर्लई : मुरुड तालुक्यातील नांदगावच्या आयुष हॉस्पिटलमध्ये रायगड इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन व नूतन स्कूल ऑफ नर्सिंग यांच्या संयुक्त विद्यमाने कंटिन्यूवंग नर्सिंग एज्युकेशन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत ३५० हून अधिक नर्सिंग व्यावसायिक व नर्सिंग विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. आधुनिक काळात आरोग्यसेवा क्षेत्रात नवीन उपचारपद्धती, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, अत्याधुनिक उपकरणे आणि संशोधनाधारित नर्सिंग सराव (प्रक्टिस) याबाबत महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल (मुंबई)चे निरीक्षक निलेश शिंदे यांनी उपस्थित नर्सिंग विद्यार्थी व व्यावसायिकांना नर्सिंग शिक्षणातील बदलते प्रवाह, आधुनिक नर्सिंगमधील नवीन ट्रेंड्स तसेच नर्सिंग क्षेत्रातील नवीन संशोधन व संशोधनाधारित पद्धती याबाबत माहितीपर मार्गदर्शन केले. बदलल्या आरोग्यसेवा क्षेत्राशी जुळवून घेण्यासाठी नर्सिंग व्यावसायिकांनी सातत्याने नवीन ज्ञान आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. तर अद्ययावत नर्सिंग ज्ञान, संशोधनाधारित नर्सिंग प्रैक्टिस आणि सातत्यपूर्ण व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच, नर्सिंग विद्यार्थी व व्यावसायिकांनी अशा शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये आवर्जून सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

निवडक

पोलीस ठाण्यात पोलीस पाटलांची बैठक



पनवेल : पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटलांची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी त्यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस पाटलांनी प्रशासनाशी समन्वय ठेवून कार्य करण्याचे आवाहन करत विविध विषयांवर मार्गदर्शन केले. बैठकीदरम्यान पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटलांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांचे भारतीय संविधानाची उद्देशिका भेट देऊन तसेच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे सहसचिव कुणाल लोंढे, पनवेल तालुका पोलीस पाटील संघाचे अध्यक्ष प्रमोद नाईक, उपाध्यक्ष प्रदीप पाटील, विजय खुटले, निलेश गायकर, मिलिंद पोपेटा, मीनाक्षी पाटील, सुगंधा पारधी, एकनाथ पाटील, वसंत पाटील, भरत पाटील, दिलीप खुटले यांच्यासह परिसरातील अनेक पोलीस पाटील उपस्थित होते. बैठकीत पोलीस व पोलीस पाटील यांच्यातील समन्वय अधिक बळकट करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावीपणे काम करण्याबाबत चर्चा करण्यात आली.



राणाप्रताप मित्र मंडळातर्फे रक्तदान

कर्जत : समर्पण रक्त केंद्र घाटकोपर यांच्या सहकार्याने कर्जत-खालापुर तालुक्यातील राजाभाऊ कोठारी यांच्या पुढाकाराने आयोजित ५४४ व्या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विठ्ठल मंदिर, मोठे वेणगांव येथे आयोजित करण्यात आले होते.याप्रसंगी एकूण ३३ रक्तदात्यांनी रक्तदान करुन राष्ट्रीय, सामाजिक व मानवतावादी कार्य करुन सहकार्य केले. याप्रसंगी राणाप्रताप मित्र मंडळाचे अध्यक्ष जितेश आंब्रे, उपाध्यक्ष वैभव सावंत, प्रशांत शिंदे, मंदार सावंत, कैलास शिंदे, हरीश जाधव, नितीन गवसकर, मनोज सावंत, किशोर शिंदे, समीर शिंदे, जयवंत केलटकर, रुपेश चव्हाण उपस्थित होते तसेच जयवंत म्हसे, डॉ. प्रशांत सदावर्ते, प्रशांत उगले अनेक मान्यवरांनी उपस्थित राहुन रक्तदात्यांचे मनोधैर्य वाढविले. या रक्तदान शिबिरात रक्त संकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तकेंद्रांचे डॉ.रमेश सिंघ, अनिता सिस्टर, शिला वाघमारे प्रदीप नितोरे, दिपेश सरदार, लक्ष्मण नाईक व इतर आरोग्य सेवकांनी उत्तम पद्धतीने केले.

कोलाडमध्ये खवय्यांच्या रांगा

कोलाड : श्रावण महिन्याला गुरुवारी सुरुवात होत असल्याने आषाढ महिन्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे बुधवारी (दि.१२) ऑगस्ट रोजी सकाळी सहा वाजल्यापासून कोलाड नाक्यावरील विविध ठिकाणी असणाऱ्या मटण शॉपवर खवय्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.श्रावण महिन्यात पूर्ण महिनाभर गणपती विसर्जनापर्यंत अनेक नागरिक मांसाहार टाळत असल्याने आजच मटण खरेदी करण्यासाठी नागरिकांनी दुकानांकडे मोठ्या प्रमाणात गर्दी केली. विविध मटण विक्रीच्या दुकानांवर तसेच मटण न खाणाऱ्या ग्राहकांची मच्छी खरेदी करण्यासाठी गर्दी केली. एकंदरीत परिस्थिती पाहता मटण असो वा मच्छी आज आषाढ महिन्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे मांसार करण्यासाठी येथील नागरिकांनी पसंती दिली. यामुळे आपल्या आवडीचे मटण आठवण अथवा मच्छी मिळावी यासाठी असंख्य नागरिकांनी मटण व मच्छीच्या दुकानांवर रांगा लावल्या होत्या. श्रावण सुरू होण्यापूर्वी मटण व मच्छी खरेदी करण्याकडे खवय्यांचा कल दिसून आला. श्रावणाच्या पार्श्वभूमीवर आजच्या खरेदीला विशेष महत्त्व आले होते. उद्यापासून श्रावण महिन्याला सुरुवात होत असल्याने पुढील काही आठवडे मटण विक्रीवर त्याचा परिणाम जाणवण्याची शक्यता आहे.



उरणमध्ये मच्छरांचे साम्राज्य

। उरण । प्रतिनिधी ।

उरण शहरासह तालुक्यात डेंग्यू, मलेरिया आणि साथीच्या आजारांनी डोके वर काढले असून प्रशासनाच्या स्वच्छता व्यवस्थेची अक्षरशः पोलखोल झाली आहे. ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग, साचलेले दूषित पाणी, तुंबलेली गटारे आणि मच्छरांचा सुळसुळाट; त्यातच भर रस्त्यावर उघड्यावर खाद्यपदार्थांची विक्री सुरू असल्याने उरणकरांच्या आरोग्याशी सर्रास खेळ सुरू असल्याचा संताप नागरिक व्यक्त करीत आहेत.

शहर आणि तालुक्यातील अनेक दवाखाने ताप, अंगदुखी, डेंग्यू, मलेरिया आणि इतर साथीच्या आजारांच्या रुग्णांनी भरत असल्याचे चित्र आहे. सुमारे हजाराच्या आसपास नागरिक बाधित असल्याचा दावा केला जात असून प्रशासनाने तातडीने अधिकृत आकडेवारी जाहीर करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे. एकीकडे डेंग्यू-मलेरियाचा फैलाव सुरू आहे.



धूळ-माती,धूर आणिमाशांच्या सान्निध्यात तयार होणारे खाद्यपदार्थ नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरत असल्याची तक्रार आहे. संबंधित विभागांचे अधिकारी नेमके करतात तरी काय, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. नगरपालिका, पंचायत समिती, आरोग्य विभाग आणि अन्न व औषध प्रशासनाने संयुक्तपणे हॉटेल, बार, रेस्टॉरंट, खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची अचानक तपासणी करावी. नियम मोडणाऱ्याचे परवाने तपासून दोषी आस्थापनांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी.

डेंग्यू-मलेरियाचा फैलाव रोखण्यासाठी धूर फवारणी, नाले-गटारेस्वच्छता,साचलेल्यापाण्याचा निचरा आणि डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट करण्याची मोहीम युद्धपातळीवर राबविण्याची गरज आहे. तसेच शहर आणि तालुक्यात तातडीने आरोग्य सर्वेक्षण करून डेंग्यू-मलेरियाच्या रुग्णांची अधिकृत संख्या जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.

दवाखान्यांत रुग्णांच्या रांगा आणि प्रशासनाच्या टेबलावर फाईलींचे ढीग-हा कारभार आता उरणकरांच्या सहनशक्तीपलीकडे गेला आहे. उरण परिसरातील बहुतांश ग्रामपंचायत हद्दीत पाणीपुरवठा दूषित होत असल्याने तसेच सततचा पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे आजारांना पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातच डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने डेंग्यू आणि मलेरियाच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू

फैलाव रोखण्यासाठी फवारणीची मागणी

कचऱ्याचे ढीग हटवा

नागरिक कर भरतात; मग बदल्यात कचरा, दूषित पाणी, मच्छर आणि अस्वच्छ खाद्यपदार्थांचा प्रसाद का मिळतो? प्रशासनाने आता तरी झोपेतून जागे व्हावे. प्रश्न केवळ डासांचा नाही; उरणकरांच्या आरोग्याचा आणि जिवाचा आहे!मच्छरांचे साम्राज्य उध्वस्त करा, कचऱ्याचे ढीग हटवा, दूषित पाण्याचा निचरा करा आणि उघड्यावरचा अस्वच्छ खाद्यबाजार बंद करा; अन्यथा प्रशासनाविरोधात नागरिकांचा संताप रस्त्यावर उतरण्याची वेळ दूर नाही.

तळा मच्छी मार्केटमध्ये खवय्यांची गर्दी



। तळा । प्रतिनिधी ।

श्रावण महिन्याच्या तोंडावर येणाऱ्या गटारी अमावस्या निमित्ताने तळा बाजारपेठेतील मच्छी मार्केटमध्ये बुधवारी (दि.१२) पहाटेपासूनच खवय्यांची मोठी गर्दी दिसून आली. श्रावणात मांसाहाराला बंदी असल्याने शेवटचा आस्वाद घेण्यासाठी लोकांनी सकाळपासूनच बाजारपेठ गजबजवली होती. तळा बाजारपेठेतील मच्छी मार्केटमध्ये बोंबील, पापलेट, कोलंबी यासारख्या माशांसाठी रांगा लागल्या होत्या. विक्रेत्यांनी देखील मागणीनुसार साठा वाढवला होता. मच्छी सोबतच चिकन आणि मटण दुकानांसमोरही लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अनेक कुटुंबे एकत्र येऊन गटारीचा बेत आखत असल्याचे चित्र होते. यामुळे बाजारपेठेत काही काळ वाहतूक कोंडीची समस्याही निर्माण झाली होती. श्रावणात शाकाहार करण्याच्या परंपरेमुळे गटारीला मांसाहार करणाऱ्यांची ही गर्दी दरवर्षी पाहायला मिळते.

जेएसएम महाविद्यालयात एड्स जनजागृती

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जेएसएम महाविद्यालय अलिबाग येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व टाटा पॉवर कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये एड्सविषयी योग्य माहिती, प्रतिबंधात्मक उपाय आणि आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.



जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. डॉ. गौतम पाटील व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या शुभेच्छा देत युवकांनी सामाजिक आणि आरोग्यविषयक जनजागृतीमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. रमेश ठोसर यांनी विद्यार्थ्यांना एड्सचे संक्रमण, प्रतिबंधात्मक उपाय, गैरसमज याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी एड्स जनजागृतीविषयक प्रश्नमंजुषा घेण्यात आली. प्रश्नमंजुषेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेत जास्तीत जास्त प्रचशनांची अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये एड्सविषयी जागरूकता निर्माण होण्यासोबतच आरोग्यदायी आणि जबाबदार समाजनिर्मितीचा संदेश पोहोचला.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड, प्रा. अश्विनी आठवले, प्रा. पंकज घरत, प्रा. प्रमोद हिवरे, रमेश ठोसर, आरजीत सिंग, अब्दुल सलाम आणि एन. एस. एस. चे स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रविण गायकवाड यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी आठवले यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. पंकज घरत यांनी केले.

चारसूत्री भात प्रात्यक्षिकाची पाहणी

। तळा । प्रतिनिधी ।

मौजे पाचघर तालुका तळा येथे 'मागेल त्याला काजू'योजनेअंतर्गत शेतकरी हरिश्चंद्र शिंदे यांना देण्यात आलेल्या काजू लागवड क्षेत्राची तसेच आत्मा योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या चारसूत्री भात लागवड प्रात्यक्षिक प्लॉटची कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.मागेल त्याला काजू या योजनेचा लाभ घेऊन शेतकरी शिंदे यांनी केलेल्या काजू कलमांच्या लागवडीची अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच 'आत्मा' अंतर्गत चारसूत्री पद्धतीचा वापर करून केलेल्या भात लागवडीच्या प्लॉटची पाहणी करताना पिकाची उत्तम स्थिती पाहून अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचे कौतुक केले. याप्रसंगी कृषी उपसंचालक प्रवीण ठिगळे, सीमा चौधरी उपविभागीय कृषी अधिकारी शुभम बोराडे, तालुका कृषी अधिकारी हनुमंत काबळे,मंडळ कृषी अधिकारी घालमे, सहाय्यक कृषी अधिकारी योगेश कोळी, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक,आत्माचे सचिन लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पनवेलमध्ये मांसाहारप्रेमींची बाजारपेठेत गर्दी

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

गटारी अमावस्येच्या पार्श्वभूमीवर मांसाहारप्रेमींनी बुधवारी (दि.१२)रोजी पनवेलच्या बाजारपेठेत मोठी गर्दी केली होती. मटण खरेदीसाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तर पनवेलच्या मच्छी मार्केटमध्येही मासे खरेदीसाठी सकाळपासूनच नागरिकांची वर्दळ पाहायला मिळाली.



श्रावण सुरू होण्यापूर्वीचा शेवटचा मांसाहाराचा दिवस मानला जात असल्याने अनेक कुटुंबांनी मटण, चिकन आणि मासे खरेदीला पसंती दिली. त्यामुळे बाजारपेठेत नेहमीपेक्षा मोठी गर्दी झाली होती. यंदा मटण आणि मासेच्या दरात वाढ झाल्याने ग्राहकांच्या खिशाला चांगलीच झळ बसली. विशेषतः गावठी कोंबडीच्या किमतीतही वाढ झाल्याचे दिसून आले. दर वाढले असले तरी गटारीच्या निमित्ताने मांसाहार करण्याचा उत्साह ग्राहकांमध्ये कायम होता.

मच्छी मार्केटमध्ये विविध प्रकारचे मासे खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. सकाळच्या सत्रातच मोठ्या प्रमाणात खरेदी झाल्याने बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण होते. गर्दीमुळे काही ठिकाणी वाहतूक आणि पार्किंगची समस्याही जाणवत होती. दरम्यान, उद्यापासून श्रावण महिन्याला सुरुवात होत असल्याने अनेक नागरिक मांसाहाराला विराम देणार आहेत. त्यामुळे आजच्या गटारी अमावस्येला मटण, चिकन आणि मासे खरेदीसाठी मोठी झुंबड उडाल्याचे चित्र पनवेलमध्ये पाहायला मिळाले.

विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे नेत्र तपासणी

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.१२) रोजी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन जुने एसटी स्टॅन्डजवळ माणगाव येथे करण्यात आले होते. या शिबिरात १४८ रुग्णांची तपासणी करून ६० नेत्ररुग्णांना पनवेल येथे त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. शिबीर पार पाडण्यासाठी विजय मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा डॉ. प्रकाश पाटील, डॉ. श्रेया, कल्याणी इलदार, नियती शिंदे, प्राची गायकवाड, बाळाजी विश्वनाथ यांनी सहकार्य केले.

चिर्ले सर्विस रोडचे काम अपूर्ण

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण परिसरातील राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अखत्यारीतील पागोटे उड्डाणपूल ते चिर्ले अटलसेतू दरम्यान सर्व्हिस रोडवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले होते. खड्ड्यांमुळे या रस्त्याची अवस्था दयनीय झाली होती. त्यामुळे या रस्त्यावरून वाहनचालकांना वाहने चालवणे अगदी अवघड होऊन बसले होते. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गप्राधिकरणाच्याअखत्यारीत सर्व्हिस रोडचे जबुतीकरण व कॉक्रीटकरण करण्याची कामे हाती



घेण्यात आली होती. मात्र, जोरदार पावसामुळे ही कामे अद्यापही पूर्ण झालेली नाहीत. अपूर्ण कामांमुळे वाहनांसाठी हे सर्व्हिस रोड सध्या तरी बंदच आहेत. बंदमुळे मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याने वाहनचालकांमध्ये नाराजी पसरली आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक अखत्यारीतील गव्हाण फाटा ते जासई उड्डाणपूल पर्यंतचे दुतर्फा रस्ते व सर्व्हिस रोडही दरवर्षी प्रमाणे यंदाही पाऊस पडताच गुडघाभर पाणी साचून राहते. पाण्याचा निचरा होत नसल्यानेच दोन्ही रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाणी साचते. या साचलेल्या पाण्यामुळे वाहतूकीसाठी रस्त्यावर वाहने चालवणे वाहनचालकांना अवघड होऊन बसते. त्यामध्ये दुतर्फा सर्व्हिस रोडवर कायम कंटेनर ट्रेलर व अवजड वाहनांची अवैधरित्या मोठ्या पार्किंग केल्या जातात. यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



'अनवट प्रेम' कथा संग्रहाचा प्रकाशन

कर्जत : कर्जत नगरपरिषद हद्दीत विठ्ठलनगरमधील रहिवासी राजेंद्र सुधाकर वैशंपायन यांनी लिहिलेल्या 'अनवट प्रेम, या कथा संग्रहाचा प्रकाशन सोहळा नुकताच संपन्न झाला. शनी मंदिराच्या रविकिरण सभागृहामध्ये श्रीराम पुरोहित यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी श्रीराम पुरोहित, अच्युत कोडगीर, ज्येष्ठ नागरिक संघाचे सुभाष नातू, सुचेता जोगळेकर उपस्थिती होते. या कार्यक्रमात अनेकांनी उत्स्फूर्तपणे राजेंद्र वैशंपायन यांचा सत्कार केला. मुख्यत्वे विठ्ठल नगरचे रहिवासी आणि राजेंद्र यांचे सर्व बालमित्र, शाळेच्या १०वी च्या बॅचचे वर्गमित्र, लक्ष्मीकांत लायब्ररीतर्फे रामदास गायकवाड, अभिनव ज्ञान मंदिर शाळेचे शिक्षक, ज्येष्ठ नागरिक संघ यांचा समावेश होता. कार्यकमाचे सूत्रसंचालन चित्रा देशमुख यांनी केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- **जन्नावर हॉस्पिटल चेंढरे** अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८०३४५०९
- **ऑफिस स्टाफ आवश्यक** Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियम वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड संपर्क : ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८ इच्छूक उमेदवारांनी संपर्क साधावा.
- **गाळा भाड्याने मिळेल.** ९४२३३७५१९८/८४११०१६४४४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

तब्बल १३३ विद्यार्थ्यांनी सहभाग | जिल्हा कृषी अधिकारी मस्के यांची विशेष उपस्थिती

पीएनपी महाविद्यालयात रानभाज्यांचे प्रदर्शन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पीएनपी कनिष्ठ महाविद्यालय, वेश्वी, अलिबाग येथे जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून निसर्गाचे दान, आरोग्यवर्धक रानभाज्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाला प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हा कृषी अधिकारी, अलिबाग रायगड पांडुरंग मस्के उपस्थित होते.

या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी विविध रानभाज्यांची माहिती व त्यांचे महत्त्व जाणून घेत, त्यांची सांगड आधुनिक खाद्यसंस्कृतीशी घातली. आजच्या तरुणाईला आवडणारे फास्टफूडदेखील रानभाज्यांपासून शिजवून तयार करून विद्यार्थ्यांनी सादर केले. त्यामुळे पारंपरिक रानभाज्यांना आधुनिक स्वरूप देण्याचा अनोखा प्रयत्न या प्रदर्शनातून



पाहायला मिळाला.

महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, नवीन पिढीमध्ये रानभाज्या खाण्याचे प्रमाण हळूहळू कमी होत चालले आहे. रानभाज्यांचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर असून, ऋतूनुसार आहारामध्ये आवश्यक बदल करणे गरजेचे आहे. त्यामुळे आपली पचनक्रिया चांगली राहण्यास मदत होते. या प्रदर्शनाच्या आयोजनासाठी सहकारी प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले, असे त्यांनी सांगितले.

या प्रदर्शनात तब्बल १३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी भारंग, माठ, कुर्डू, टाकळा, अळू, कवळा, कंटोळी, तसेच नाचणीची भाकरी, ज्वारीची भाकरी, तांदळाची भाकरी, पराठे विविध प्रकारच्या रानभाज्यांपासून तयार केलेले विविध खाद्यपदार्थ सादर केले. सर्व पदार्थ अतिशय सुंदर पद्धतीने तयार करण्यात आले होते. परीक्षकांनी या पदार्थांचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे आणि मेहनतीचे कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक खाद्यसंस्कृती, स्थानिक जैवविविधता आणि आरोग्यदायी आहार यांचा एक वेगळा अनुभव मिळाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्याविष्काराचे सुंदर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रदर्शनात सहभागी सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी पीएनपी कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रविंद्र पाटील, वरिष्ठमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कार्यालयीन समन्वयक गबाजी गीते, उपप्राचार्य निशिकांत कोळसे, प्रा. तेजस म्हात्रे, प्रा. दिनेश पाटील, होली चाईल्ड सीबीएसई शाळेच्या मुख्याध्यापिका एम. वैल्लैयम्माल, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "रानभाज्यांविषयी जनमानसात जनजागृती होणे गरजेचे असून, त्यासाठी अशा प्रकारच्या प्रदर्शनांचे आयोजन महत्त्वपूर्ण आहे. पावसाळ्यात नैसर्गिकरित्या उपलब्ध होणाऱ्या या रानभाज्या कोणत्याही रासायनिक खतांशिवाय तयार होतात. त्यामुळे त्या पौष्टिक, कॅल्शियमयुक्त तसेच औषधी गुणधर्मांनी समृद्ध असून आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. पावसाळ्याच्या दिवसांत निसर्गाकडून मिळणारे हे अनमोल खाद्य आहे.
> -पांडुरंग मस्के
> जिल्हा कृषी अधिकारी"

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ४३/२०२६

जाहिर नोटीस

प्रति,
श्री. आसिम अब्दुल रउफ शहाबंदर,
रा. आंबेडकर रोड मुरुड, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड — अर्जदार

विरुध्द

मुख्याधिकारी,
नगर परिषद मुरुड-जंजिरा,
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ०३-०५-१९६९ रोजी मौजे मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद नगर परिषद मुरुड-जंजिरा, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ / मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ०३-०५-१९६९ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक १९/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे. सही/-
(आदेश डफळ)
तहसिलदार मुरुड-जंजिरा

अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायालय.व.स्तर सो. यांच्या न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज ७३/२०२६
नि.क्र.

जाहीर नोटीस

श्री. अशोक शंकर घरत ----- अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ----- सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, अर्जदार हे वरील नमूद पत्यावर राहत असून अर्जदार यांची पत्नी कै. आशा अशोक घरत ह्यांचा दिनांक ०८/११/२०२५ रोजी राहत्या घरी मौजे. सासवणे-अलिबाग येथे मयत झाले आहेत. त्यांस अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत.

कै. आशा अशोक घरत यांचे वारस म्हणून दाखला मिळावा याकरिता अर्जदार यांनी या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्याना कै. आशा अशोक घरत यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत किवा दि. २५/०८/२०२६ पर्यंत स्वत: किवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचाही कसलाही प्रकारची हरकत असल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे कै. आशा अशोक घरत यांचे वारस म्हणून वारस दाखला देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येऊन मे कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकुम अर्जदार यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोद घ्यावी.

आज दि. ११ माहे, ०८ २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(लिपिक)
सही
दिवाणी न्यायाधीश
व.स्तर अलिबाग
कोर्टाचा शिक्का
अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व. स्तर अलिबाग

जाहीर नोटीस

अर्जदारांतर्फे वकील वैशाली बंगेरा
दिवाणी चौकशी अर्ज क्र. १०५/२०२६

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात

१. श्रीमती. रंजना सदानंद पावसकर
रा. टिळक रोड, वेधशाळेसमोर,
ता. अलिबाग, जि. रायगड.
२. श्रीमती. अर्पणा गजानन पावसकर
रा. १६४७ निसर्ग वसाहत, वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड.
३. श्री. प्रतिक गजानन पावसकर
४. श्री. निलेश गजानन पावसकर
नं. ३ व ४, रा. साळवी वाडा,
ता. अलिबाग, जि. रायगड
— अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, कै. कमुबाई गोपाळ पावसकर, रा. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे दि. १२/०१/२००३ रोजी जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे निधन झाले आहे. कै. कमुबाई गोपाळ पावसकर यांचे मृत्यूपश्चात त्यांची दोन्ही मुले अनुकमे कै. गजानन यांचे दि. ०३/१०/२००७ व कै. गोपाळ यांचे दि. ०४/१०/२०१३ रोजी ही निधन झालेले आहे. त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हे कै. कमुबाई गोपाळ पावसकर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. कै. कमुबाई गोपाळ पावसकर यांचे खुद्द मालकीची खुद्द ताबेकब्जा वहिवाटीतील मौजे अलिबाग येथे नगरभूमापन क्र. १२०६/के/२बी, क्षेत्र २९.३० चौ.मी. ही मिळकत असून सदर मिळकत हि अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीत येते तिचा मालमत्ता क्र. ALB000001994 जुना मालमत्ता क. Z1CL0002009 मॅन्युअल मालमत्ता क्र. १६७३ असा असून त्याचे क्षेत्रफळ ५७.३५ एवढे आहे. या स्थावर मिळकतीचे त्यांचे मृत्युपश्चात कामकाजासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. याकरीता दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला मिळणे आवश्यक आहे. सबब अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह सदर चौकशी अर्जाचे नेमलेली तारीख १० /०९/२०२६ अशी आहे. सदर नेमलेल्या तारखेस मा. न्यायालयात लेखी स्वरुपात हरकत द्यावी. नेमलेल्या तारखेस तशी हरकत न आल्यास हे मा. न्यायालय उपलब्ध पुराव्याचे आधारे पुढील कायदेशीर कारवाई करील व अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणाचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. आज दि. ११/०८/२०२६ रोजी आमच्या सही शिक्यानिशी दिली.

सही/- सही/-
व. लिपिक **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व स्तर शिक्का **दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर**
अलिबाग **अलिबाग- रायगड**

रायगड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी लि. अलिबाग
रजि.न.के.बी.ए.बी.एन. के १०४ स्थापना १८-०१-१९६३
६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त सभासदांसाठी)

रायगड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी लि., अलिबाग या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २९-०८-२०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता 'स्वर्गीय गोविंद बाबू नार्वेकर सभागृह' भंडारी भवन, पतंग हॉटेलच्या जवळ, श्रीबाग नं.२ अलिबाग-रेवदंडा रोड, ता. अलिबाग, जि. रायगड येथे चेअरमन श्री. राजेंद्र हरिश्चंद्र गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

-: सभेपुढील विषय :-

१. मागील दि. ०३-०८-२०२५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. सन २०२५-२०२६ या वर्षाचे नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक वाचून मंजूर करणे.
३. सन २०२५-२०२६ या वर्षाच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
४. सन २०२६-२०२७ या वर्षाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५. सन २०२५-२०२६ चा वैधानिक लेखापरीक्षक यांचे अहवाल वाचणे.
६. सन २०२६-२०२७ सालासाठी वैधानिक लेखापरीक्षक व टॅक्स ऑडीटर यांची नेमणूक करणे.
७. सन २०२६-२०२७ सालासाठी अंतर्गत हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्थांसाठी सुधारीत आदर्श उपविधी (२०२६) स्वीकारणे बाबत.
९. मा. चेअरमन यांचे परवानगीने आयत्या वेळीच्या विषयांचा विचार करणे.

सुदिन सु. कांबळे **वैभव ज. पाटील** **राजेंद्र ह. गायकवाड**
ऑ.सेक्रेटरी **व्हा. चेअरमन** **चेअरमन**
अलिबाग
दिनांक :- १३-०८-२०२६

सुचना : १. गणपूर्ती अभावी सभा तहकुब करावी लागल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल, त्या सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. सन्माननीय सभासदांनी सभेपुढे मांडावयाच्या सूचना, लेखी स्वरुपात वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी पाच दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात पाठवाव्यात.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं	क्षेत्र	आकार	
			हे.आर. पॉ	रुपये	पैसे
जयमाला जगदिश म्हसे	४५	६	०-१५-००	०	१०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१
अॅड. भुपेश तानाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक:-१३/०८/२०२६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांजकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.(आर. चौ.मी)	आकार (रू.पै.)
धोकवडे ता.अलिबाग	५०५	क्षेत्र ०-३५-०० पो.ख.०-०१-०० एकुण ०-३६-००	०.६४

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार लिएन, चार्ज, ताबा, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसहक्क व हितसंबंध अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खाली दिलेल्या आमच्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरूपात आणून द्याव्यात.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर येणारी कुणाचीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,
अलिबाग,
तारीख : १३/०८/२०२६

(अॅड. सागर विजय पाटील)
पत्ता : मु. घर नं. १६०६,
लालबाग, ब्राम्हण आळी,
ता.अलिबाग, जि. रायगड.
मो.नं.९९२२५६७८९१

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांजकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै)
नागांव, ता.अलिबाग	१६४७	०-३५-४० बागायत ०-०४-२० पो.ख. ०-३९-६० एकुण	९.५७

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अमित महादेव राजपूत यांच्या नावे असणारे बागायत एकुण क्षेत्र ०-०७-८० हे.आर., आकार २ रू ११ पैसे जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक १२/०८/२०२६

अॅड राहूल रमेश नाईक
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

PUBLIC NOTICE

The general public is hereby informed that my client, M/s. Aries Habitat Pvt. Ltd. [formerly known as Aries Holistic Health Care Pvt. Ltd.], is the lawful owner and possessor of the immovable properties described below. The said lands are duly recorded under valid registered title deeds and revenue records.

Property Details: Situated at Village Boris, Taluka Alibag. District Raigad

1) Survey No. 42/1 - Area 0-96-00 H.R., Assessment Rs. 2.38
2) Survey No. 42/2 - Area 0-88-00 H.R., Assessment Rs. 2.20
3) Survey No. 41/2 - Area 0-38-00 H.R., Assessment Rs. 1.81
4) Survey No. 41/3 (part) - Area 0-16-80 H.R., Assessment Rs. 0.81
5) Survey No. 42/3 (part) - Area 0-42-50 H.R., Assessment Rs. 1.06

It has come to the notice of the Director of the said company, **Mr.Arun Kumar Boppana** (son of late Jaya Jaya Rao Boppana), that certain unscrupulous and fraudulent persons are attempting to alienate the above lands by creating forged and fabricated documents.

My client states that all original title documents pertaining to the aforesaid properties are in the custody of the company, and **Mr. Arun Kumar Boppana (Mobile: 9223332200)** is the sole authorized representative of the company.

Necessary complaints and representations have already been lodged with the local police authorities, the Sub-Registrar's office, and other concerned officials in this regard.

The public is hereby cautioned and warned not to negotiate, enter into any agreements, or execute any sale deeds in respect of the aforesaid properties with any person or persons falsely claiming to represent M/s. Aries Habitat Pvt. Ltd. without the knowledge and consent of Mr. Arun Kumar Boppana. Any such dealings, if undertaken despite this notice, shall be entirely at the risk, cost, and peril of the parties concerned, and my client shall not be held responsible for the same.

Dated 12 Aug. 26

Swapnil Narendra Mhatre
(Advocate)

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली शेतजमिनीची मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीच्या मालकांकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे- दहिवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड.

गट नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे-आर.चौ.मी	आकार रू. पैसे
१	१	०-०६.००	०.३४
		०-०२.८०	
	एकुण	०-०८.८०	

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकतीचे वरीलप्रमाणेचे मालकी हक्कांची पडताळणी पूर्ण करु व मिळकत बोजारहीत असल्याचे स्पष्ट झाल्यास, सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून, सदरहू मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १३/०८/२०२६

अॅड. निकिता पंकज तरे वकील
पत्ता : कोदिवले, पो. नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड
मोबाईल नं. ७७९८६०७७०१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक **१) निर्मला नारायण जाधव २) निर्मला सदाशिव गवळी ३) मंजूळा गणू राणे ४) सोमीनाथ दामू भगत ५) रंजना तुकाराम शिंगटे ६) केदार भालचंद्र दळवी ७) आरती राजेश अहुजा ८) अनंता दामू भगत** यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे. आर.	आकार रु. पै.
७२	१	०-५६-६० पैकी ०-४०-००	०-५३

सबब सदर वर नमुद केलेल्या क्षेत्राच्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास वर नमुद केलेल्या क्षेत्राची मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १३/०८/२०२६

ॲड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी. दिनकर-निमकर
अपार्टमेन्ट बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकती त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेली आहे.

मौजे वरई तर्फे निड, तालुका - कर्जत, जि - रायगड येथील बिनशेती मिळकती

मालकाचे नाव	सर्वे नं.	प्लॉट नं.	क्षेत्र आर.चौ.मी	आकार रू. पै.
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	१	१९५	१९.५०
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	२	२००	२०.००
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	३	२०५	२०.५०
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	४	२००	२०.००
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	५	२००	२०.००
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	६	१९५	१९.५०
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	७	२५०	२५.००
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	८	२२५	२२.५०
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	९	५००	५०.००
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	१०	१९५	१९.५०
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	११	१९५	१९.५०
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	१२	१९५	१९.५०
१) विपुला प्रदिप महाजन २) सरोजिनीदेवी उर्फ सरोज विजयसिंह थोरात	४९/४/अ	१३	९४५	०.००

सदरील बिनशेती मिळकती ह्या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील बिनशेती मिळकती या तद्गंभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १३/०८/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
अॅड. स्वप्निल बाबूराव देशमूख
पत्ता. सदनिका नं. ५०४, ५ वा मजला, गजवक्र
रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८८३०५६०९६२/९२७३२२४६८०

जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक अजित बळीराम घरत यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (आर.चौ.मी.)	आकार (रू.पैसे)
वरंडे ता.अलिबाग जि.रायगड	५४३	क्षेत्र ०.४१.०० पो.ख ०.०१.०० एकुण ०.४२.००	४.७३

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ०.४२.०० हे. आर. आकार ४.७३ रू. पैसे या मिळकतीपैकी ०.२०.०० हे. आर

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ११/०८/२०२६

अॅड. विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की, मौजे धावटे, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक श्री पार्थ राजेंद्रकुमार जैन व ए. शिवरामन यांचे मालकीची असून सदर मिळकत माझे आशिल विकत घेत आहे.

गांव	गट नं.	क्षेत्र	आकार रु.पै	खाते नं.
धावटे	५६/२/अ	०.६८.८०	१८.९२	१९१

सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी, सदर मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरुन माझे आशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाण : पेण
दि. १३/०८/२०२६
अॅड हेमा ज.पाटील (घोडिंदे)
पेण पोलीस स्टेशनजवळ तहसिल ऑफिस
आवारात, पेण, ता.पेण जि.रायगड -४०२१०७
मो. नं.९८२२०३०३८९

जाहीर नोटीस

दिनांक : ११/०८/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. संजयकुमार पुरूषोत्तम पाटील, रा. शहाबाज, ता.अलिबाग, जि.रायगड यांना खालील जमिन मिळकत मा. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर अलिबाग यांचेकडील रे.मु.नं.८९/२०२२ मधील दि.१९/०१/२०२३ रोजीच्या तडजोडीच्या हुकूमनाम्याप्रमाणे मिळालेली असून सद

पूर्वनियोजित सामने केले स्थगित | भारतासोबतचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न

बांगलादेशला बीसीसीआयचा दणका



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतासोबत क्रिकेट पुन्हा सुरू करण्याच्या बांगलादेशच्या प्रयत्नांना मोठा धक्का बसला आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्ड टीम इंडियासोबत क्रिकेट मालिका आयोजित करण्याच्या प्रयत्नात होते. बीसीबीच्या योजनेनुसार, त्यांना सप्टेंबरमध्ये टीम इंडियासोबत तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळायची होती. दोन्ही बोर्डांमध्ये चर्चा सुरू झाली होती, परंतु पूर्वनियोजित वेळापत्रकामुळे ही मालिका आता होण्याची शक्यता कमी आहे.

वास्तविक पाहता, सप्टेंबरमध्ये भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात तीन सामन्यांची टी-२० मालिका नियोजित आहे. हे सामने १३, १५ आणि १७ सप्टेंबर रोजी अरुण जेटली स्टेडियमवर खेळवले जाणार आहेत. क्रिकबझच्या वृत्तानुसार, ही मालिका जवळपास निश्चित झाली असून केवळ अधिकृत घोषणेची प्रतीक्षा आहे. यामुळेच सप्टेंबरमध्ये बांगलादेशसोबत क्रिकेट सामना होण्याची शक्यता कमी आहे. बीसीसीआयने याबाबत कळवले असल्याचेही सांगण्यात येत आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या आयसीसी टी-२० विश्वचषकामुळे भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध ताणले गेले आहेत. वास्तविक पाहता, बांगलादेशने भारतात आपले सामने खेळण्यास नकार दिला होता, ज्यामुळे त्यांच्या जागी स्कॉटलंडचा समावेश करण्यात आला. बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या आग्रहामुळे टीम इंडियाच्या टी-२० विश्वचषक आयोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या घटनेमुळे दोन्ही देशांच्या क्रिकेट बोर्डांमध्ये मतभेदांचा काळ सुरू झाला.

भारत आणि बांगलादेश यांच्यातील क्रिकेटसंदर्भातील वाद २०२६ च्या अगदी आधी सुरू झाला. आयपीएल लिलावात बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला केकेआरने मोठ्या रकमेत विकत घेतल्यामुळे हा मुद्दा निर्माण झाला होता. त्याच वेळी, बांगलादेशात जातीय हिंसाचार उफाळून आला होता, आणि तेथील गैर-मुस्लिम समुदायावरील क्रूरतेच्या घटनांमुळे भारतात मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली. परिणामी, जेव्हा एका बांगलादेशी क्रिकेटपटूच्या आयपीएलमध्ये खेळण्याची बातमी समोर आली, तेव्हा विरोध वाढला. परिस्थिती चिघळत असल्याचे पाहून, बीसीसीआयने केकेआरला मुस्तफिजुरला सोडण्याचे निर्देश दिले.

मुस्तफिजुरच्या सुटकेनंतर, बांगलादेश क्रिकेट बोर्डाने सुरक्षेच्या धोक्याचे कारण देत टी-२० विश्वचषक स्पर्धेत सहभागी न होण्याची घोषणा करून बीसीसीआयवर कारवाई सुरू केली. खूप मनधरणी करूनही, बांगलादेश क्रिकेटने नकार दिला आणि त्याऐवजी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्कॉटलंडची निवड झाली. यामुळे भारत आणि बांगलादेश क्रिकेट यांच्यात तणाव निर्माण झाला. तथापि, बांगलादेशला लवकरच आपली चूक लक्षात आली आणि ते भारतासोबतचे संबंध सुधारण्यासाठी पावले उचलत आहेत.

बांगलादेशविरुद्ध ऑस्ट्रेलियाचे प्लेइंग-११ जाहीर

| डार्विन | वृत्तसंस्था |

ऑस्ट्रेलियाने बांगलादेशविरुद्ध सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीसाठी प्लेइंग-११ ची घोषणा केली आहे. ऑस्ट्रेलिया संघ डार्विनमध्ये कसोटी सामना खेळण्यासाठी उतरत आहे. ८ महिन्यांत कंगारू संघाचा हा पहिला कसोटी सामना असेल. स्कॉट बोलँडला पहिल्या कसोटीतून वगळण्यात आले आहे. संघ व्यवस्थापनाने वेगवान गोलंदाजीमध्ये हेजलवुडला बोलँडवर प्राधान्य दिले आहे. यासोबतच कमिन्स, हेजलवुड आणि स्टार्क एका वर्षापेक्षा जास्त काळानंतर पहिल्यांदाच एका सामन्यात एकत्र खेळताना दिसतील. हॅमस्ट्रिंग दुखापतीमुळे बाहेर राहिलेल्या फिरकीपटू नॅथन लायनची प्लेइंग इलेव्हनमध्ये वापसी झाली आहे. फलंदाजी अष्टपैलू ग्रीन आणि वेबस्टर या दोघांना संघात स्थान मिळाले आहे.

मेस्सीचा फुटबॉलमधून अनिश्चित काळासाठी ब्रेक

- वडिलांच्या निधनानंतर घेतला मोठा निर्णय
- इंटर मियामीने मेस्सीला दिला पूर्ण पाठिंबा



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीचे वडील जॉर्ज मेस्सी यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी निधन झाले आहे. ते काही काळापासून आजारी होते आणि रोझारियो येथील एका रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. जॉर्ज मेस्सी यांच्या निधनानंतर मेस्सीने फुटबॉलमधून तात्पुरती आणि आपल्या कारकिर्दीतून अनिश्चित काळासाठी विश्रांती घेतली आहे. मेस्सी आपल्या कुटुंबासोबत राहण्यासाठी अर्जेंटिनाच्या रोझारियो शहरात परतला आहे. इंटर मियामीने त्याला पूर्ण पाठिंबा दिला असला तरी, त्याच्या पुनरागमनाची कोणतीही निश्चित वेळ सांगितलेली नाही. त्यामुळे, ३९ वर्षीय मेस्सी मैदानावर कधी परत येईल हे अद्याप अस्पष्ट आहे.

मेस्सीचे वडील, जॉर्ज मेस्सी, यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यानंतर तो एका खाजगी विमानाने आपल्या मूळ गावी रोझारियोला गेला. त्याने आपल्या कुटुंबासोबत अंत्यविधी पूर्ण केली. मेस्सी दक्षिण फ्लोरिडामध्ये इंटर मियामीच्या आगामी लीग्स कप सामन्यासाठी तयारी करत होता. अचानक वडिलांच्या निधनाची बातमी मिळताच, त्याने तात्काळ अर्जेंटिनाला परतण्याचा निर्णय घेतला. स्पॅनिश प्रकाशन मार्काच्या वृत्तानुसार, इंटर मियामीने मेस्सीला पूर्ण पाठिंबा दिला असून त्याला बिनशर्त रजा मंजूर केली आहे. क्लबने अद्याप मेस्सीच्या परतण्याची तारीख निश्चित केलेली नाही. याचा अर्थ असा की, जोपर्यंत त्याला फुटबॉलसाठी परतण्याची इच्छा नाही, तोपर्यंत मेस्सी आपल्या कुटुंबासोबत अर्जेंटिनामध्ये राहू शकतो. त्याचे संघात परतणे आणि निवड ही पूर्णपणे त्याच्या वैयक्तिक परिस्थितीवर आणि तयारीवर अवलंबून असेल. जॉर्ज मेस्सी यांनी आपल्या मुलाच्या कारकिर्दीत खूप महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी त्याच्या सुरुवातीच्या दिवसांपासून त्याचे व्यवस्थापक, प्रतिनिधी आणि सल्लागार म्हणून काम केले. रोझारियोमधील त्याच्या युवा कारकिर्दीच्या सुरुवातीपासून ते जागतिक फुटबॉलच्या शिखरापर्यंतच्या प्रवासात जॉर्ज मेस्सीसोबत होते. त्यामुळे, त्यांचे निधन मेस्सीसाठी वैयक्तिक आणि प्रोफेशनल अशा दोन्ही स्तरांवर एक मोठे नुकसान आहे. मेस्सीने फुटबॉलमधून घेतलेली विश्रांती अशा वेळी आली आहे, जेव्हा तो उत्कृष्ट फॉर्ममध्ये परतत होता. त्याने नुकतेच लीग कपमध्ये ॲटलेटिको सॅन लुईस विरुद्ध दोन गोल केले होते. पण वडिलांच्या निधनानंतर, मेस्सीने कुटुंबासोबत वेळ घालवण्याला प्राधान्य दिले आहे.


निवडक



अफगाणिस्तानचा वर्ल्ड कपमध्ये दिमाखात प्रवेश !

नवी दिल्ली : अफगाणिस्तान क्रिकेट संघाने २०२७ च्या वनडे क्रिकेट वर्ल्ड कपमध्ये थेट प्रवेश मिळवला आहे. आयर्लंडविरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यात अफगाणिस्तानने तीन विकेट्सने विजय मिळवत वर्ल्ड कपमधील स्थान निश्चित केले. या विजयासह अफगाणिस्तानने पाच सामन्यांच्या मालिकेत आघाडी घेतली.बेलफास्टमध्ये झालेल्या सामन्यात आयर्लंडने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना अफगाणिस्तानच्या फलंदाजांनी संयमी सुरुवात केली. रहमानुल्लाह गुरबाजने ७१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत संघाच्या विजयाचा पाया मजबूत केला. मधल्या फळीतील फलंदाजांनीही परिस्थितीनुसार खेळ करत संघाला लक्ष्याच्या जवळ नेले.अखेर अफगाणिस्तानने तीन विकेट्स राखून सामना जिंकला. या विजयामुळे अफगाणिस्तानला वर्ल्ड कपच्या थेट पात्रतेसाठी आवश्यक स्थान मिळाले. अफगाणिस्तानच्या पात्रतेमुळे वेस्ट इंडिजला मोठा धक्का बसला आहे. दोन वेळचा विश्वविजेता वेस्ट इंडिज संघ आता थेट पात्रतेपासून दूर राहिला असून त्याला पात्रता फेरीचा मार्ग स्वीकारावा लागणार आहे.वेस्ट इंडिजसारख्या बलाढ्य संघाला पुन्हा पात्रता फेरी खेळावी लागणे ही क्रिकेट विश्वातील मोठी बातमी मानली जात आहे.

ऑलिंपिक पदकविजेता कुस्तीपटू सुशीलकुमार तुरुंगातच



नवी दिल्ली : दोन वेळा ऑलिंपिक पदकविजेता ठरलेला कुस्तीपटू सुशीलकुमार याला मोठा धक्का बसला आहे. माजी ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती विजेता सागर धनकर याच्या छत्रसाल स्टेडियमनजीक हत्या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने सुशीलकुमार याला जामीन नाकारला. न्यायमूर्ती पुरुषेंद्रकुमार यांनी ६ ऑगस्ट रोजी सुशीलकुमारचा जामीन अर्ज फेटाळला. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी त्याचा जामीन रद्द करताना साक्षीदारांवर प्रभाव टाकण्याची शक्यता व्यक्त केली होती.सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी जामीन रद्द करताना असे म्हटले होते की, सुशीलकुमारची समाजातील मोठी ओळख आणि प्रभाव आहे. त्याला तात्पुरता जामीन मिळाल्यावर साक्षीदार आपली भूमिका बदलत असल्याचेही न्यायालयाने लक्षात घेतले होते. न्यायालयाने म्हटले की, सागरचे वडील अशोक धनकर यांनी दिलेली साक्ष सरकारी पक्षाच्या बाजूने आहे की नाही, हे पुराव्यांचे मूल्यमापन केल्यानंतरच ठरवता येईल.

आंद्रे रसेलची वादळी खेळी



सॅबिना पार्क : कॅरेबियन प्रीमियर लीगमध्ये वेस्ट इंडीजचा तडाखेबाज फलंदाज आंद्रे रसेलने पुन्हा एकदा आपल्या आक्रमक फलंदाजीची झलक दाखवली. बार्बाडोस ट्रायडेंट्सविरुद्धच्या सामन्यात जमैका किंग्समेनकडून खेळताना रसेलने अवघ्या ३८ चेंडूत ६८ धावा कुटल्या. परंतु, संघाला विजय मिळवून देण्यात तो अपयशी ठरला. या रोमहर्षक सामन्यात बार्बाडोस ट्रायडेंट्सने पाच धावांनी विजय मिळवला. या सामन्यात बार्बाडोस ट्रायडेंट्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ३ बाद २०६ धावा केल्या. बार्बाडोस ट्रायडेंट्सकडून मिळालेल्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना जमैका किंग्समेनची सुरुवात अत्यंत खराब झाली. डॅनियल सॅम्सने सुरुवातीच्या षटकांमध्ये जमैकाला धक्के दिले आणि अवघ्या ८ धावांवर संघाचे ३ फलंदाज माघारी परतले. केसी कार्टीने २७ चेंडूत ४५ धावा, तर कर्णधार रॉव्हमन पॉवेलने २४ चेंडूत ३८ धावा करत डाव सावरण्याचा प्रयत्न केला. यानंतर आंद्रे रसेलने मैदानात उतरताच बार्बाडोसच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला.

आग्रावमधील नारळ फोडी स्पर्धेत ग्रंथ नाखवा प्रथम

शितळादेवी मित्र मंडळातर्फे केले होते स्पर्धेचे आयोजन

| रेवदंडा | प्रतिनिधी |

श्री. शितळादेवी मित्र मंडळाच्या वतीने स्व. चिंतामण गुरव व स्व. कमलाकर घरत यांच्या स्मरणार्थ नारळ फोडी स्पर्धा २०२६ उत्साहात संपन्न झाली चौल शितळादेवी मंदिर समोरील प्रांगणात या स्पर्धेस प्रारंभ झाला. या स्पर्धेला परिसरातील नागरिक व स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.स्पर्धेचे नियोजन केदार मळेकर यांच्या विशेष पुढाकारांनी करण्यात आले होते

या स्पर्धेचे उद्घाटन ॲड. प्रशांत वर्तक, अजित गुरव, मारुती भगत, नंदकुमार वर्तक, राजेंद्र गुरव, संदिप गुरव आणि प्रवीण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी केदार मळेकर, कुणाल घरत, प्रथमेश गुरव, अश्विन गुरव, प्रीतेश नाईक, प्रसाद नाईक, स्वरूप माळी, तौसीफ चोगले, आदित्य ठाकूर आणि प्रसाद पाटील, सोहम गुरव, रुपेश माळी यांनी सांभाळली.

स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिकांसह आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांक ग्रंथ नखवा यांनी पटकावला. त्यांना ३ हजार रुपये व ट्रॉफी देण्यात आली. द्वितीय क्रमांक स्वप्निल पंकज यांनी मिळविला असून त्यांना २ हजार रुपये व ट्रॉफी, तर तृतीय क्रमांक मुकेश बामजी यांनी मिळवित १ हजार रुपये व ट्रॉफी पटकावली. याशिवाय उत्कृष्ट मारेकरी म्हणून रुद्र किर यांची निवड करण्यात आली. स्पर्धेतील बक्षीस वितरणाचा कार्यक्रम सुरेंद्र म्हात्रे व नंदकुमार वर्तक यांच्या हस्ते पार पडला.स्व. चिंतामण गुरव व स्व. कमलाकर घरत यांच्या स्मृती जपण्यासोबतच सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम ांना चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात नियम ावली नुसार पार पडली. स्पर्धेत गुण लेखनाचे काम दिपेश पाटील, हेमंत पाटील,प्रसाद पाटील यांनी पाहिले.

फुटबॉलर रोनाल्डोने केले जॉर्जिनाशी लग्न

| पोर्तुगाल | वृत्तसंस्था |

रोनाल्डोने पोर्तुगालमध्ये आपली गर्लफ्रेंड जॉर्जिना रॉड्रिगेजसोबत लग्न केले आहे. दोघांच्या लग्नाबद्दल गत अनेक वर्षांपासून अटकळी सुरू होत्या. दोघांनी सिव्हिल मॅरेज केले. रोनाल्डो व जॉर्जिना २०१६ मध्ये माद्रिदमध्ये भेटले होते. तेव्हापासून ते एकत्र आहेत. त्यांनी इंस्टाग्राम वर त्यांच्या अंगठ्या दाखवताना एक फोटो देखील शेअर केला. या दोघांना मिळून चार मुले आहेत. रोनाल्डो आणि जॉर्जिनाने एक वर्षापूर्वी, १२ ऑगस्ट २०२५ रोजी साखरपुडा केला होता.

बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी उपाय योजनांची सरबत्ती

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

गेल्या काही महिन्यापूर्वी दिल्ली येथे इंडिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेत अचानक प्रेक्षकांमध्ये सामने पाहायला एक माकड येऊन बसलं होतं. त्याचे फोटोज आणि व्हिडीओज सगळीकडे वायरल झाल्यानंतर प्रशासनाची नाचक्की झाली, रील्स बनल्या आणि आयोजकांची फजिती झाली. या घटनेची दखल जागतिक पातळीवर सुद्धा घेतली गेली .

त्यामुळे आता होणाऱ्या बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियन स्पर्धे साठी आयोजकांनी माकडांना स्पर्धे पासून दूर ठेवण्यासाठी कंबर कसली आहे. त्यांनी चक्क स्पर्धा होईपर्यंत



लायटिंगचा बंदोबस्त झाला

इंडिया ओपन स्पर्धेदरम्यान लायटिंगचा मुद्दा चर्चेत आला होता. सामना सुरु असताना कोर्टवर कमी लाइट्समुळे सावली पडता कामा नये म्हणून २२०० आणि २४०० प्रकाशमान देणारे दिवे कोर्टच्या समान अंतरावर बसवण्यात आले आहे. तसेच कोर्टच्या वरच्या बाजूला पांढरा प्रकाश देणारा दिवा सुद्धा बसवण्यात आला आहे. सामन्याच्या पुरस्कार वितरणावेळी सुद्धा खास दिव्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या सगळ्या लायटिंग मुळे यावेळची स्पर्धा दिमाखात पार पडेल असे आश्वासन आयोजकांनी दिले असल्याचे बोलले जात आहे.

माकडांचा एक विशिष्ट आवाज काढून त्यांना घाबरवणारे आणि पाळायला भाग पाडणारे लोकं कामावर ठेवली आहेत. तसेच इतर प्राणी पक्षांसाठी सुद्धा उपाय यंत्रणा केली आहे .

तसेच वन्यजीव कायद्यानुसार आता लंगूर माकडाचा वापर करण्यावर बंदी आल्यानंतर आता काही प्रशिक्षित माणसं माकडाचा आवाज काढतात . या अश्या दिल्लीतल्या लोकांवर एक हिंदी सुंदर हिंदी सिनेमा ही येऊन गेला आहे. एब अलाय ओ असं त्या सिनेमाचं नाव आहे. हा सिनेमा नेटफ्लिक्स वर उपलब्ध आहे.

जल्लोष करताना खड्ड्यात पडला खेळाडू

| रॉब टॅनर | वृत्तसंस्था |

फुटबॉलच्या मैदानावर जल्लोष करताना ब्राझीलमध्ये फुटबॉलपटूला हा आनंद इतका महागात पडला की तो थेट स्टेडियममधील एका गुप्त खड्ड्यात पडला. कोरिंटिबाचा २९ वर्षीय कर्णधार आणि डिफेंडर जेसी मारान्हाओने सामन्यात एका शानदार हेडरने गोल केला. आपला आनंद व्यक्त करण्यासाठी जेसीने चेंडू उचलला, आपली पत्नी गर्भवती आहे हे सांगण्यासाठी त्याने तो आपल्या जर्सीच्या आत टाकला आणि जल्लोष करण्यासाठी कॉर्नर फ्लॅगच्या दिशेने धावला.

बबिता दुसऱ्यांदा बनली आई

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

कुस्तीपटू बबिता फोगाट यांच्या घरी पुन्हा एकदा आनंदाचं वातावरण आहे. बबिता फोगाट दुसऱ्यांदा आई झाली असून एका गोंडस मुलीला जन्म दिला आहे. दिल्लीतील शालीमार बाग येथील एका रुग्णालयात बबिताने एका मुलीला जन्म दिला. बबिता फोगाट यांनी घरी जानेवारी २०२१ मध्ये मुलाला जन्म दिला होता. आता परीचं घरी आगमन झाल्यानंतर तिने हा आनंद आपल्या चाहत्यांसोबत सोशल मीडियाच्या माध्यमातून शेअर केला आहे. फोटो शेअर करताना चिमुकलीचा चेहरा दाखवला नाही, पण छान इमोजी लावून तिने आपल्या भावना चाहत्यांपर्यंत पोहोचवल्या आहेत.

बबिता फोगाट यांनी सोशल मीडियावर मुलीसोबत फोटो शेअर केला. तसेच माहिती देत सांगितलं की, महादेवाची कृपा पाहा, आज शिवरात्रीच्या पवित्र दिवशी, पार्वती स्वरूप एक चिमुकली परी माझ्या आयुष्यात आली आहे. मला मुलीच्या रूपात मिळालेला आनंद हा माझ्यासाठी आणि माझ्या कुटुंबासाठी एक अनमोल आशीर्वाद आहे.

दारू सोडली अन् वेटलिफ्टिंगमध्ये नाव कमावले

| म्हापसा | वृत्तसंस्था |

दारूच्या व्यसनामुळे माणसाचा शारीरिक, मानसिक आणि आर्थिक नाश होतो. त्याचबरोबर हसती-खेळती कुटुंबे आणि संसार पूर्णपणे उद्ध्वस्त होतात. मात्र दारूचे व्यसन सोडल्यामुळे माणसाचे आयुष्य कसे बदलू शकते, याची प्रेरणादायी यशोगाथा म्हणजे कारोणा-हळदोणा येथील ४१ वर्षीय युवक विश्वास हळर्णकर, आज नियमित सराव, कसून मेहनतीद्वारे त्यांनी स्वतःत बदल घडवले आहेत. उत्कृष्ट वेटलिफ्टिंग पटू म्हणून त्यांच्या नावावर अनेक पदकेही आहेत.



उत्कृष्ट आरंभीच्या काळात फुटबॉलपटू असलेला तसेच व्यवसायाने मच्छीमार असलेला विश्वास वयाच्या २१व्या वर्षी आपले भविष्य घडवण्यासाठी विदेशातील कुवेत देशात गेला. गोव्यात परतून काही काळ वास्तव केल्यानंतर २००७ साली पुन्हा दुबईत गेला. त्याच दरम्यान घरात घडलेल्या प्रसंगामुळे तसेच पालकांच्या अचानक निधनामुळे त्याला पुन्हा गोव्यात परतावे लागले. पालकांचे निधन आणि घरात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे विश्वासची मानसिकता ढळली आणि तो हळूहळू दारू व्यसनाच्या आहारी गेला.

> व्यसनामुळे आपले वजन ८४ किलो होते. आज उपचारानंतर आपले वजन ५८ किलो झाले असून आपण इतराप्रमाणे चांगले आनंदित व्यसनविरहित आयुष्य जगतो. व्यसनामुळे आयुष्य उद्ध्वस्त होते. त्यामुळे प्रत्येकाने स्वतःला व्यसनापासून दूर ठेवावे.
> – विश्वास हळर्णकर, वेटलिफ्टिंगपटू

याच दरम्यान आपली भेट डॉ. गौरेश गांजेकर यांच्याशी झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपण व्यसनमुक्तीचा प्रवास सुरू केला. २०१८ सालापासून सतत उपचार घेतल्याने आज अत्यंत चांगले निरोगी जीवन जगत असल्याचे विश्वास यांनी सांगितले. त्याचे श्रेय त्यांनी डॉक्टर गांजेकर यांना दिले.

बलात्कार प्रकरणात जामीन रद्द | ३ दिवसांची पोलीस कोठडी

अभिषेक पोरेलच्या अडचणीत वाढ

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

यष्टिरक्षक-फलंदाज अभिषेक पोरेलच्या अडचणीत वाढ झाली आहे. लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याच्या आरोपाशी संबंधित एका बलात्कार प्रकरणात तो मंगळवारी चिनसुराह येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर झाला होता; न्यायालयाने त्याचा जामीन रद्द केला आणि या बंगालच्या क्रिकेटपटूला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

विशेष म्हणजे, २३ जून रोजी कर्नाटकात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका तरुणीने दिल्ली कॅपिटल्सच्या या यष्टिरक्षक-फलंदाजाविरुद्ध मोगरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार,



मतभेदातून दोघांमध्ये वाढला दुरावा

लग्नाच्या खोट्या आश्वसनाखाली पोरेलने आपल्यासोबत शारीरिक संबंध ठेवल्याचा गंभीर आरोप तिने केला आहे. मात्र, सुमारे दीड वर्षांपूर्वी त्यांच्यात आपापसात मतभेद निर्माण झाले, ज्यामुळे दुरावा वाढला. हे प्रकरण याआधीही पोलिसांच्या निदर्शनास आले होते, परंतु त्या वेळी कोणतीही औपचारिक तक्रार दाखल करण्यात आली नव्हती.

अभिषेक आणि ती तरुणी सुमारे साडेतीन वर्षे रिलेशनशिपमध्ये होते. अभिषेकने तिच्याशी लग्न करण्याचे वचन दिले होते आणि त्यांनी एकत्र परदेश प्रवासही केला होता, परंतु कालांतराने त्यांच्यातील संबंध बिघडले, असा आरोप तक्रारदार तरुणीने केला आहे.

सुमारे दीड वर्षापूर्वी, दोघांमधील वाद इतका विकोपाला गेला होता की पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला होता, तरीही त्यावेळी कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली नव्हती. नंतर, जेव्हा परिस्थिती पुन्हा बिघडली, तेव्हा त्या तरुणीने मोगरा पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली.

मोगरा पोलिसांनी तपास सुरू केला आणि चंदननगर येथील क्रिकेटपटूच्या निवासस्थानी अनेकदा भेट दिली, परंतु तो त्यांना सापडला नाही. त्यानंतर, तक्रारदाराने कलकत्ता उच्च न्यायालयात धाव घेतली, ज्याने क्रिकेटपटूला अटक करण्याचे आदेश दिले; यानंतर मोगरा पोलिसांनी त्याला अटक केली आणि मंगळवारी चिनसुराह न्यायालयात हजर केले.

अभिषेक पोरेलने २०२३ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केले. त्याने आतापर्यंत चार हंगामांत संघासाठी ३५ सामने खेळले असून २५.६३ च्या सरासरीने ७६९ धावा केल्या आहेत. त्याने या लीगमध्ये चार अर्धशतके झळकावली आहेत. या डावखुऱ्या खेळाडूने आपल्या कारकिर्दीत आतापर्यंत ३२ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत आणि ३१.२८ च्या सरासरीने १,४०८ धावा केल्या आहेत. या काळात त्याने एक शतक आणि १२ अर्धशतके ठोकली. २३ लिस्ट-एफ सामन्यांमध्ये अभिषेकने ८३३ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये दोन शतके आणि पाच अर्धशतकांचा समावेश आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)